cmyk

## संपादकीय

### नेपाळमधील सत्ताधाऱ्यांचा अहंकार खाक !

नेपाळमधील सध्याच्या निदर्शनांमध्ये सहभागी असलेले बहुतेक तरुण २८ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत, म्हणून याला 'जनरेशन-झेड' आंदोलन म्हटलं जात आहे. तरुण पिढी अशा प्रकारे रस्त्यावर उतरण्याची ही कदाचित पहिलीच वेळ आहे; पण ही नाराजी फक्त 'सोशल मीडिया'वरील बंदीबद्दल आहे का? याचं उत्तर नाही असं आहे. 'सोशल मीडिया' हे भ्रष्टाचाराला लक्ष्य करण्यासाठी एक शस्त्र होतं.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३७ | शुक्रवार, दि.१२ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### पंजाबमधील पूरग्रस्तांसाठी किंग खानची सर्वाधीक मदत

मुंबईः पंजाबमध्ये सततच्या पावसामुळे आणि ढगफुटीमुळे तेथील लोकांना पुराचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पंजाबमध्ये या भयानक पूरसदृश परिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली आहे. अशा परिस्थितीत मनोरंजन क्षेत्रातील अनेक स्टार्सनी पुढे येऊन पुरामुळे बाधित कुटुंबांना मदत साहित्य आणि मदत केली आहे. आता शाहरुख खाननेही या उदात्त कार्यात आपले नाव नोंदवले आहे. शाहरुख खानच्या मीर फाउंडेशनकडून आवश्यक मदत किट वाटल्या जात आहेत, ज्यामध्ये औषधे, स्वच्छताविषयक वस्तू, अन्नपदार्थ, मच्छरदाणी, ताडपत्री, फोल्डिंग बेड, कापसाचे गादे आणि इतर आवश्यक वस्तूंचा समावेश आहे.

## थोडक्यात...

### राहुल गांधी सुरक्षा प्रोटोकॉल पाळत नाहीत

नवी दिल्लीः केंद्रीय राखीव पोलिस दलाने(सीआरपीएफ) काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून राहुल गांधी हे सुरक्षा प्रोटोकॉलचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. इटली, व्हिएतनाम, दुबई, कतार, लंडन आणि मलेशिया यासारख्या देशांच्या दौऱ्यांदरम्यान राहुल गांधी यांनी सुरक्षा प्रोटोकॉलचे उल्लंघन केल्याचे सीआरपीएफने म्हटले आहे. सीआरपीएफने राहुल गांधी यांना एक वेगळे पत्र लिहून या प्रकरणाची माहिती दिली आहे. पत्रात असे लिहिले आहे की त्यांच्या सुरक्षेचा विचार करता असे करणे गंभीर चिंतेची बाब आहे. अशा चुकांमुळे व्हीव्हीआयपी सुरक्षा कमकुवत होते. राहुल यांच्यासाठी झेड प्लस सिक्युरिटीमध्ये एकूण ५५ सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. यामध्ये १० हून अधिक सीआरपीएफ कमांडोंचा समावेश आहे.

### मोदींचा वाढदिवस भाजप 'सेवा पंधरवडा' करणार

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस भाजप 'सेवा पंधरवडा' म्हणून साजरा करणार आहे. या मोहिमेद्वारे पक्ष पंतप्रधानांची 'सेवक' म्हणून प्रतिमा मजबूत करण्याचा प्रयत्न करेल. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (गांधी जयंती) या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेअंतर्गत भाजप देशभरात रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरे, वृक्षारोपण आणि प्रदर्शन असे कार्यक्रम आयोजित करेल. याद्वारे मोदी सरकारच्या आतापर्यंतच्या कामगिरीची आठवण करून देण्याचा आणि भविष्यातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनसंपर्क वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल. भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पक्षाचे सरचिटणीस सुनील बन्सल यांनी ही माहिती दिली.

### गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र सर्वोत्तम – फडणवीस

मुंबईः महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. 'इज ऑफ ड्युईंग बिझनेस' अंतर्गत राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि सीईओंसोबत राऊंटटेबल कॉन्फरन्स वेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तत्पर असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासन विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा समावेश आहे.

### भारत- पाकिस्तान सामना होऊ द्या – सुप्रीम कोर्ट

दिल्लीः आशिया चषक स्पर्धेतील रविवार, १४ सप्टेंबर रोजी होणारा भारत-पाकिस्तान क्रिकेट सामना रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि.११) नकार दिला. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना खेळणे हे राष्ट्रीय हिताच्या विरोधात असल्याचे संबंधित याचिकेत नमूद कण्यात आले होते. याचिकेवर न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणी सुनावणीची एवढी काय गडबड आहे. हा एक सामना आहे, तो होऊ द्या,'' असे न्यायमूर्ती माहेश्वरी यांनी स्पष्ट केले.

### छत्तीसगडमध्ये १० नक्षलवादी ठार

गरियाबंदः छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत एका चकमकीत नक्षलवादी मनोज उर्फ बालकृष्ण याच्यासह १० नक्षलवाद्यांना ठार केले आहे. ही कारवाई सुरक्षा दलांसाठी मोठी यशस्वी ठरली आहे. रायपूर रेंजचे आयजी अमरेश मिश्रा यांनी सांगितले की, सुरक्षा दल आणि नक्षलवादी यांच्यात थांबून-थांबून गोळीबार सुरू आहे. आणखी काही नक्षलवाद्यांचा खात्मा झाल्याची शक्यता आहे. या चकमकीत बालकृष्ण उर्फ बालन्ना उर्फ रामचंद्र उर्फ राजेंद्र उर्फ गोलकोंडा उर्फ चिन्नी उर्फ मनोज याला ठार करण्यात आले आहे. ५८ वर्षीय बालकृष्ण हा तेलंगाना येथील वारंगल जिल्ह्याचा रहिवासी होता.

# ज्या वर्षाचा एफआरपी त्याच वर्षाचा उतारा ग्राह्य धरणार

## शेतकऱ्यांना मिळणारे पैसे आणि कारखानदार यांचा मेळ घालीत एफआरपी समितीचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

**साखर उद्योगासमोरील अडचणी लक्षात घेता ज्या वर्षीची एफआरपी त्याच वर्षाचा साखर उतारा धरून एफआरपी रक्कम अदा करावी. याबाबत शासन स्तरावरून सूचित करावे, असा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एफआरपी समितीच्या बैठकीत घेण्यात आला.**

बैठकीत साखर हंगामाच्या दृष्टीने विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. मात्र, खास करून ज्या वर्षाची एफआरपी त्याच हंगामातील साखर उतारा यावर चर्चा



झाली. यामध्ये साखर आयुक्त कार्यालयाने याबाबत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत माहिती दिली. याचिकाकर्त्याने मागील वर्षाच्या साखर उताऱ्यानुसार एफआरपी देण्याबाबतची मागणी केली होती. मात्र, याबाबत न्यायालयाने शासनाला आदेशित केले नसल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही. सद्यःस्थितीत सहकारी साखर कारखानदारी अडचणीत आली असून, वस्तुस्थिती मांडून राज्य शासनाने ताठर भूमिका घेतल्यास सहकारी साखर कारखान्यांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल, असे आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी सूचित केले. एफआरपीप्रमाणे दर निश्चित करताना ▶▶ पान २ वर

### अशी आहे एफआरपी समिती

उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे-पाटील, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ, आमदार प्रकाश सोळंके, जयप्रकाश दांडेगावकर, बी. बी. ठोंबरे, संजय खताळ, अजित चौगुले.

# मराठा आरक्षणाची लढाई पुन्हा न्यायालयात

## दोन याचिका दाखल;मराठा समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास नसल्याचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आता थेट मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने हैदराबाद गॅझेटियर व सातारा गॅझेटियरच्या आधारे २ सप्टेंबर रोजी काढलेल्या जीआरला विरोध करत दोन नवीन जनहित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांमध्ये सरकारने घेतलेला निर्णय बेकायदेशीर असल्याने तो रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या याचिका शिव अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेने ॲड. सतीश तळेकर यांच्यामार्फत आणि वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केल्या आहेत. या याचिकांवर मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे. याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे की, मराठा आणि कुणबी ▶▶ पान २ वर




### जरांगे भुजबळामध्ये वार-प्रतिवार

ओबीसीला नेता लाभला आहे. वेगळे चॉकलेट देऊन नेते कामाला लावतो, असे म्हणत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली. आम्ही सर्व लोकशाही मार्गाने करतो असेही जरांगे पाटील म्हणाले. १८० जातीच्या साडेचारशे जाती कशा झाल्या हे सुद्धा सरकारने सांगावे असे जरांगे म्हणाले. दुसरीकडे मंत्री भुजबळ म्हणाले की, या देशात लोकशाही आहे. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आहे. त्यामुळे इथे जरांगेशाही येणार नाही, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला.

### मराठा समाजाला सरसकट आरक्षण नाही-मुख्यमंत्री



मराठा आंदोलनानंतर राज्य सरकारने काढलेला शासन निर्णय हा सरसकट आरक्षण देणार नाही. तर पुरावा तपासूनच आरक्षण मिळणार असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी केला. फडणवीस म्हणाले की, याचिका करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. आम्ही विचार करुन शासन निर्णय काढला आहे, कोणालाही सरसकट आरक्षण हा शासन निर्णय देत नाही. पुराव्याने जे कुणबी आहेत, त्यांनाच हा शासन निर्णय मदत करतो. तसेच न्यायालयातही राज्य सरकारच्या वतीने आम्ही योग्य भूमिका मांडू, असे फडणवीस म्हणाले.

#### ओबीसी आरक्षण संपल्याच्या भीतीने

### लातूरच्या तरुणाची मांजरा नदीत उडी

लातूर । प्रतिनिधी



**ओबीसी आरक्षण संपल्याच्या भीतीने तरुणाने मांजरा नदीपात्रात उडी घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना लातूर जिल्ह्यात घडल्याचे समोर आलं आहे. येथील रेणापूर तालुक्यातील वांगदरी गावातील भरत महादेव कराड (वय ३५) या तरुणाने ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निषेधार्थ मांजरा नदीपात्रात उडी मारुन आत्महत्या केली**

मयत भरत कराड हे रिक्षाचालक होते, रिक्षा चालवूनच ते उदरनिर्वाह करत होते. ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनातही ते गेल्या काही वर्षांपासून सक्रियपणे सहभागी झाले होते. सरकारने मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेट लागू करून 'कुणबी' म्हणून ओबीसी आरक्षणात सामील करण्याचा निर्णय घेतल्यामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात येईल, या निषेधार्थ त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे.मांजरा नदीपात्रात उडी मारण्यापूर्वी त्यांनी ''ओबीसींना आरक्षण मिळालेच पाहिजे'', ''सरकार ओबीसी विरोधी आहे'' अशा घोषणा दिल्या. काही तरुणांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, ▶▶ पान २ वर

## तहसीलदाराच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न

जालना । प्रतिनिधी


वाळू माफियांची वाढलेली मुजोरी अजूनही कमी झालेली नाही. जालना जिल्ह्यातही मुजोरी पुन्हा एकदा पाहण्यास मिळाली असून, कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदाराच्या अंगावर ट्रॅक्टर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न वाळू माफियांकडून करण्यात ▶▶ पान २ वर



## बीडमध्ये २३ दिवसात ३ अधिकाऱ्यांच्या आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

गेल्या २३ दिवसात बीड जिल्ह्यात ३ अधिकाऱ्यांनी आपले जीवन संपवल्याच्या घटना घडल्या आहेत. दोन दिवसांपुर्वी ९ सप्टेंबर रोजी गेवराई येथील माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांनी डोक्यात गोळ्या झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना ताजी असतानाच बीड पंचायत समितीच्या विस्तार



अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

जिल्ह्यात आत्महत्या नवीन नाही पण त्यातच मागील २३ दिवसात सरकारी वकील विनायक लिंबाजी चंदेल (वय ४७, रा. इंदेवाडी, जि. परभणी) यांनी २० ऑगस्ट रोजी वडवणी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. तर त्यानंतर वडवणी येथीलच प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम यादव (वय २९) यांनी देठेवाडी गावाजवळील तलावात उडी मारून आत्महत्या केल्याचे ६ सप्टेंबर रोजी उघडकीस आले होते. आता परळी ▶▶ पान २ वर

## राज्यातील ३४ हजार शिक्षकांच्या वेतनश्रेणी बदलाचा मार्ग मोकळा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करूनही प्रमाणपत्र न मिळाल्याने शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठवता येत नव्हता. त्यामुळे मोठे नुकसान होत होते. मात्र, आता एससीईआरटीने पुढील आठवड्यात प्रमाणपत्रे देण्यात येणार असल्याने शिक्षकांचा मार्ग मोकळा झाला आहे.


राज्यातील सरकारी वेतनावर असलेल्या शिक्षकांच्या सेवेला १२ वर्षे पूर्ण झाली की, त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू होते. तसेच २४ वर्षांनंतर हे शिक्षक निवडश्रेणीसाठी ▶▶ पान २ वर

## गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना त्यांच्या स्वतःच्या विद्यमान कर्तव्यांसोबतच महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून जबाबदारी पार पाडण्यासाठी नियुक्त केले.

देशाचे नवे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन महाराष्ट्राचे राज्यपाल होते. ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ५६.५० क्विंटल | १,९२६ | २,८९० | २,६०७ |
| ज्वारी/हायब्रिड :५०.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,३०० |
| मका/लोकलः५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : २१.५० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५६ |
| उडीद : १४३.५० क्विंटल | ३,८०० | ६,३०० | ५,२७८ |
| बाजरीः ४८.५० क्विंटल | २,३०० | २,७२१ | २,५६६ |
| मुगः९.५० क्विंटल | ५,००० | ६,५१५ | ५,८१० |
| सोयाबीनः ३३.५० क्विंटल | ३,७५० | ४,३०० | ४,११६ |
| हरभराः ५.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |

# फिजिओथेअरपिस्टना आता 'डॉक्टर' लावता येणार नाही !

## आरोग्य सेवा महासंचालनालय यांचा निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**आरोग्य सेवा महासंचालनालय यांनी फिजिओथेअरपिस्टसाठी एक महत्वाचा आदेश जारी केला असून, डीजीएचएस यांनी फिजिओथेअरपिस्ट यांनी आपल्या नावासमोर डॉक्टर अशी उपाधी लावू नये असे आदेश दिले आहेत. ते वैद्यकीय डॉक्टर नाहीत असे डीजीएचएस ने स्पष्ट केले आहे.**

डीजीएचएस डॉक्टर सुनिता शर्मा यांनी लिहिलेल्या एका पत्रानुसार फिजिओथेअरपिस्टनी त्यांच्या नावासमोर डॉक्टर लावणे हे इंडियन मेडिकल डीग्री ॲक्ट १९१६ चे उल्लंघन आहे. त्यांनी हे



पत्र आयएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर दिलीप भानूशाली यांना लिहिले आहे. त्यात त्या म्हणतात, 'फिजिओथेरपिस्ट हे प्रशिक्षित वैद्यकीय डॉक्टर नाहीत. त्यामुळे त्यांनी डॉक्टर ही उपाधी लावू नये. यामुळे पेशंट आणि सामान्य ▶▶ पान २ वर

### तर केली जाणार कारवाई

डीजीएचएसने स्पष्ट केले की, इथिक्स कमिटी ऑफ काऊन्सील यांनी यापूर्वी निर्णय घेतला होता की डॉक्टर ही उपाधी फक्त नोंदणीकृत मॉडर्न मेडिसीन, आयुर्वेद, होमिओपॅथी आणि युनानी प्रॅक्टिशनर्सनाच लावता येते. वैद्यकीय क्षेत्रातील इतर कोणत्याही श्रेणीतील लोकांना ही उपाधी लावता येणार नाही. जर याचे उल्लंघन झाले तर आयएमएच्या कलम ७, ६ आणि ६ अ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

#### बेपत्ता बालिकेचा मृतदेह आढळला

### आगोदर मुलीला संपवले नंतर बापाने घेतला गळफास

बीड । प्रतिनिधी

बीडपासून काही अंतरावर असलेल्या इमामपूर रोड परिसरात एका व्यक्तीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना दोन दिवसापूर्वी घडली होती. सदरील हा व्यक्ती भाटसांगवी येथील होता. या व्यक्तीसोबत त्याची चार वर्षीय मुलगी होती. या मुलीचा बीड ग्रामीण पोलीस व नातेवाईक शोध घेत होते.सदरील मुलीचा मृतदेह आज सकाळी बीडपासून जवळच असलेल्या रामगड परिसरातील एका लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. निर्दय बापाने आधी मुलीला फाशी देवून नंतर त्याने फाशी घेतली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नेपाळमधील सत्ताधाऱ्यांचा अहंकार खाक !

नेपाळमधील सध्याच्या निदर्शनांमध्ये सहभागी असलेले बहुतेक तरुण २८ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत, म्हणून याला 'जनरेशन-झेड' आंदोलन म्हटलं जात आहे. तरुण पिढी अशा प्रकारे रस्त्यावर उतरण्याची ही कदाचित पहिलीच वेळ आहे; पण ही नाराजी फक्त 'सोशल मीडिया'वरील बंदीबद्दल आहे का? याचं उत्तर नाही असं आहे. 'सोशल मीडिया' हे भ्रष्टाचाराला लक्ष्य करण्यासाठी एक शस्त्र होतं.

२००८ मध्ये नेपाळ लोकशाही प्रजासत्ताक झाल्यापासून, फक्त नेत्यांचा एक गट सत्तेच्या केंद्रस्थानी आहे. तेच नेते आळीपाळीनं खुर्चीवर येत-जात राहिले. सत्तेचं चक्र ओली, माओवादी केंद्राचे पुष्प कमल दहल प्रचंड आणि पाच वेळा पंतप्रधान राहिलेले शेर बहादूर देउबा यांच्यातच फिरत राहिलं. त्यांच्यात युती अनेकदा तयार होते आणि अनेकदा तुटत राहते. त्याचा युवकांना वीट आला होता. नेपाळ सरकारनं फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामसह सर्व 'सोशल मीडिया ॲप्स'ना नोंदणी करण्याचे आदेश दिले आणि एका आठवड्यानंतर सर्व ॲप्सवर बंदी घालण्यात आली. या बंदीच्या विरोधात हजारो तरुण रस्त्यावर उतरले. नेपाळच्या संसदेवर हल्ला झाला. पोलिसांनी प्रत्युत्तर दिलं. त्यामुळं पोलिसांवर हल्ला झाला. नेपाळमधून येणारे हिंसाचाराचे फोटो पाहिल्यानंतर, प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न आहे, हा गोंधळ फक्त 'सोशल मीडिया ॲप्स'साठी आहे की 'जनरेशन-झेड' (१९९७-२०१२ दरम्यान जन्मलेले लोक) यांच्या या निदर्शनामागं दुसरं काही कारण आहे? खरं तर, नेपाळमध्ये भ्रष्टाचाराचा आवाज बऱ्याच काळापासून उठत आहे. गेल्या वर्षीही राजेशाही परत आणण्याच्या मागणीसाठी निदर्शनं झाली होती. ओली सरकारवर अनेकदा भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचे आरोप झाले आहेत. त्याचा 'सोशल मीडिया'वरही परिणाम होऊ लागला. नेपाळ सरकारवर घराणेशाहीचा आरोप आहे. नेत्यांची मुलं आणि कुटुंबं यासह त्यांची आलिशान जीवनशैली आणि वैभव 'सोशल मीडिया'वर उघड होत होते. दरम्यान, नेपो बेबी मोहीमदेखील नेपाळच्या 'सोशल मीडिया'वर ट्रेंड होऊ लागली. त्यामुळं तरुणांचा राग येण्याचा अंदाज येऊ शकतो. गेल्या चार वर्षात नेपाळ सरकारवर अनेक मोठे घोटाळे आणि भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. विशेषतः जेव्हा नेपाळ सरकारचे तीन मोठे घोटाळे उघडकीस आले, तेव्हा तरुणांचा संताप सातव्या आकाशाला भिडला. २०२१ गिरी बंधू जमीन स्वॅप घोटाळा ५४ हजार ६०० कोटी रुपये, २०२३ ओरिएंटल सहकारी घोटाळा १३ हजार ६०० कोटी २०२४ सहकारी घोटाळा ६९ हजार ६०० कोटी रुपये अशा घोटाळ्यांच्या मालिका उघड झाल्यानं आणि त्यात सत्ताधाऱ्यांचा संबंध यामुळं तिथल्या युवकांच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. नेपाळमध्ये बेरोजगारीचा दर सतत वाढत आहे. सध्या, नेपाळमधील १०.७१ टक्के तरुण बेरोजगार आहेत. त्याच वेळी, नेपाळचा महागाई दर ५.२ टक्के आहे. नेपाळमधील फक्त २० टक्के लोकांकडे देशाच्या ५६ टक्के संपत्ती आहे. त्यात नेपाळचे राजकारणीदेखील समाविष्ट आहेत. आर्थिक विषमतेमुळं नेपाळमध्ये प्रचंड नाराजी होती. या सर्व गोष्टींचा उद्रेक नेपाळमध्ये झाला. हिंसाचारात वीसहून अधिक लोकांचा बळी गेला. मोठी वित्तहानी झाली. राष्ट्रपती, पंतप्रधानांसह सर्वांचा बळी गेला. अर्थात त्याला तेच जबाबदार आहेत. हिंसाचाराच्या आगीत सत्ताधाऱ्यांच्या अहंकाराची होळी झाली. (उत्तरार्ध...)

## वाहन चालवणारे अल्पवयीन मुलावर परतुरमध्ये कारवाई ; ७७ हजाराचा दंड वसूल



**परतूर । प्रतिनिधी**

**परतूर मध्ये १० सप्टेंबर रोजी पोलीस ठाणे परतुर हद्दीत वाहतुक नियमन बाबत विशेष मोहीम तसेच विविध ठिकाणी नाकाबंदी राबविण्यात आली होती त्यामध्ये परतुर शहरात व परीसरात नाकाबंदी राबवुन एकुण ७६ वाहने चेक केली. त्यापैकी एकुण २० दोन चाकी वाहणावर ट्रिपल सिट, फॅन्सी नंबर प्लेट व इतर वाहतुक नियमन न करणा-यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच एकुण (१६) दुचाकी वाहने अल्पवयीन मुले चालवीतांना आढळुन आल्याने त्यांचे पालकांना पोलीस ठाणे परतुर येथे बोलावुन घेऊन समज व नोटीस देवुन वाहनावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. सदरील कार्यवाहीत एकुण ७७,५००/- रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.**

यापुढेही परतुर शहरात व परिसरात वेळोवेळी अशा प्रकारच्या मोहीम राबविण्यात येणार आहेत. सदरची मोहीम ही मा. पोलीस अधीक्षक श्री अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नेपाणी, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री आर.टी.रेंगे, परतुर पोलीस ठाणेचे श्री.सुदाम भागवत, श्री.रावते, पोउपनि पोलीस अंमलदार दिपक आढे, बालाजी पितळे यांनी मोहीम पार पाडली.

## मुख्यमंत्री माझी शाळा २ लाखचे पारितोषिक मिळवून देणारे प्रा.महादेव काळे यांची बदली



**परतुर । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दैठणा बुद्रुक चे मुख्याध्यापक आदर्श सन्माननीय महादेव काळे सर आज बदली झाली त्यांच्या सारखा आदर्श व्यक्तिमत्व आदर्श शिक्षक ज्यांनी शाळेबरोबर गावालाही शिस्त लावली एक आदर्श शिक्षक म्हणून नेहमी दैठना गावातील विद्यार्थी यांच्या स्मरणात राहतील शाळेमध्ये अस्वच्छता पूर्णपणे घाण होती सर्व विद्यार्थी हे जिल्हा परिषद सोडून इंग्लिश स्कूलमध्ये ॲडमिशन साठी पालक धाव घेत होते**

खरं पाहायला गेलं तर दैठना जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या मार्गावर होती परंतु प्राध्यापक काळे सर सर्व लोकांना विश्वासात घेऊन शाळेचं शिक्षण दर्जेदार आणि चांगल्या प्रकारे बदललं आज विद्यार्थी संख्या व गुणवत्ता पूर्णपणे वाढलेली आहे त्यांच्या पुढाकाराने माझी शाळा मुख्यमंत्री दोन लाख रुपयांचे पारितोषिक दैठना शाळेला मिळाले शाळेच्या चांगल्या कामासाठी व विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यासाठी त्यांनी काही वेळेस गावातील लोकांसोबत टोकाची भूमिका घेऊन वादही केली त्यांना त्रास ही झाला तरीही त्यांनी जिद्द आणि विश्वास ठेवला जसं जसं शाळेची गुणवत्ता दाखवली तसंच तसं लोकांनी सुद्धा त्यांना खूप प्रेम दिलं गावकऱ्यांनी ऐकणं म्हणून दैठणा बुद्रुक येथील शाळा प्रशस्त सुसज्ज आणि शिस्तबद्ध अशी झालेली आहे काळे सरांच्या विषय बोलावं तेवढं कमीच आहे शब्दही अपुरे पडतील असं त्यांनी योगदान दिले आहे नक्कीच भविष्यामध्ये त्यांची उणीव गावकर्यांना भासत राहील आणि त्यांच्या हाताखाली जे विद्यार्थी शिकलेत विश्वासाने खात्रीशीर ते नक्कीच भविष्यामध्ये उच्च पदावर असतील असे वक्तव्य आपल्या मनभरल्या भावनेतून गावाचे सरपंच शत्रुघन कणसे हे करत होते,

## अवघ्या २४ तासातच तलवाडा पोलिसांनी अपहरण झालेल्या मुकादामाची फिल्मी स्टाईलने केली सुटका

तलवाडा । प्रतिनिधी

देवपिंपरी येथील मुकादम रवींद्र पाटोळे हे तलवाडा येथे सामाजिक कामानिमित्त आले होते ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आपल्या सहकाऱ्यांसोबत चहा पिण्यासाठी थांबले असता तिथे बगेवाडी येथील नऊ जण उपस्थित होते त्यांनी एम एच १३ ए झेड २२१० ही गाडी तेथे बोलावून घेतली त्या गाडीमधून चौघेजण खाली उतरले आणि या सर्वांनी मिळून मुकादम रवींद्र पाटोळे यांच्यावर झडप घातली त्यांना मारहाण करत या सर्वांनी त्यांची उचल बांगडी करून त्यांना जबरदस्तीने गाडीमध्ये बसवले आणि टाकरवन मार्गे माजलगाव रोड ने तेलगाव वरून कारी फाटा कारी फाट्यावरून कासारी येथील डोंगर दऱ्यामधील एका शेतातील गाय गोठ्यावर डांबुन ठेवले होते ही माहिती अपहरणकर्त्याच्या पत्नीला माहिती होताच त्यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे धाव घेतली आणि घडलेली सर्व हकीगत तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांना सांगितले या प्रकरणाची पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी मनोज निलंगेकर यांनी गंभीर दखल घेत अपहरण कर्त्याच्या पत्नीची १५ आरोपी विरुद्ध तक्रार दाखल करून घेतली आणि तपासाची चक्रे गतिमान केली अपहरण कार्त्याच्या शोधासाठी तलवाडा पोलीस स्टेशनचे पीएसआय कैलास अन्नलदास व पो.ह शेख मोहसिन पो.ह.अंजन गडदे पो.ह.सुग्रीव रुपनर यांना सरकारी गाडीने रवाना केले पीएसआय अन्नलदास पो.ह शेख मोहसीन पो.ह.अंजन गडदे पो.ह सुग्रीव रुपणर हे तलवाडा पोलीस स्टेशनची सरकारी गाडी घेऊन ते सरळ



अपहरण कर्त्याच्या शोधासाठी कासारी गावात जाऊन बडे यांच्या शेतातील गाय गोठा शोधू लागले हा गाय गोठा शोधत असताना त्यांना डोंगर दऱ्याच्या दगड गोट्यातून पाण्याच्या तलावातून काटेरी झुडपांच्या झाडीतून चिखल गोट्याच्या पाय वाटेने पायी प्रवास करून शेतातील गाय गोठ्यात डांबुन ठेवलेल्या मुकादमाला ताब्यात घेतले आणि तलवाडा पोलीस स्टेशन येथे एपीआय मनोज निलंगेकर साहेब यांच्यासमोर हजर केले तलवाडा पोलीसांनी अवघ्या २४तासातच अपहरण झालेल्या मुकादामाची सुटका केली या उत्तम कामगिरीमुळे तलवाडा पोलिसांचे गावकऱ्यांकडून कौतुक केले जात आहे.

## पान ६ वरून...

### महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या

झाली आहे ही तमाम अंबाजोगाईकरांच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची गोष्ट आहे असे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले. डॉ.इंगोले यांचे मनोविकृतीशास्त्रातील आतापर्यंतचे योगदान, सामाजिक कार्यातील सहभाग व विविध शासकीय समित्यांवर विविध पदावर कार्य केल्याची नोंद महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने घेत त्यांची नियुक्ती महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या मेडिकल निगलिजन्स केसेसच्या स्क्रुटिनायझिंग कमिटीवर केली आहे. डॉ.इंगोले हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. विविध क्षेत्रात ते उल्लेखनीय कार्य करीत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अंबाजोगाईतील वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी तसेच सामाजिक क्षेत्रातील, राजकीय क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील, साहित्य क्षेत्रातील, सहकार क्षेत्रातील विविध मित्र मंडळींनी आनंद व्यक्त करीत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

-----------

### १७ सप्टेंबरला बीड

आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत हे स्वत: प्रत्येक बाबींचा आढावा घेवून नियोजन करत आहेत. यावेळी रेल्वे प्रशासनातर्फे उपमुख्य अभियंता डी.डी. लोळगे, उपमुख्य अभियंता (इलेक्ट्रीक) ज्ञानेंद्रसिंग, रेल्वे विभागाचे विभागीय अधिकारी जितेंद्र सिंग व वरिष्ठ समन्वयक विजयकुमार रॉय तसेच अधिकारी उपस्थित होते . ही प्राथमिक पाहणी असून बैठक व्यवस्था व इतर मार्ग याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यावेळी सांगितले.

-----------

### पाटोदा व नायगावसाठी

आमदार सुरेश धस यांच्या विकासाचा मेरू सुरू असल्याने मतदारसंघातील जनता समाधानी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे दरम्यान पाटोदा शहर तालुक्यातील पर्यटन क्षेत्र असलेल्या मयूर अभयारण्य नायगाव शासकीय विश्रामगृहाच्या नवनिर्माण साठी आमदार सुरेश आणि लक्ष घातले असून विश्रामगराचे उच्च श्रेणी विश्रामगृहात रूपांतर व्हावे अशी मागणी शासन दरबारी केली आहे त्यामुळे आगामी काळात त्यांच्या माध्यमातून सदरील कामे पूर्णत्वास जाणार असल्याने विश्रामगरात येणाऱ्या पर्यटकांसाठी सोयीचे ठरणार आहे तरी पाटोदा शहरातील विश्रामगृह हे शासकीय अधिकारी नेतेमंडळी साठी फायदेशीर असणार आहे

-----------

## पंचायतराज अभियान अंतर्गत आज कार्यशाळा

**अंबड । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.**

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणा-या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमाता वाढविण्याकरीता, उत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थीक वर्षापासुन तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य अशा स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरीता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या अभियानाचा कालावधी हा दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा आहे. त्या अनुषंगाने अंबड पंचायत समिती च्या वतीने दिनांक १२ सप्टेंबर रोजी सकाळी१२ वाजता मत्स्योदरी देवी सभागृह येथे कार्यशाळा ठेवण्यात आली आहे अशी माहिती अंबड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांनी दिली आहे.या शासन निर्णयामध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत एकुण ०७ मुख्य घटक आहे. सुशासन युक्त पंचायत लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे. सक्षम पंचायत (स्वनिधी, व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थीक दृष्ट्या सक्षम करणे)जलसमृध्द स्वच्छ व हरीत गाव निर्माण करणे. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे. गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे. उपजिविका विकास, सामाजिक न्याय. लोकसहभाग व श्रमदान माध्मातुन लोकचळवळ निर्माण करणे. याचा उद्दिष्ट आहे. शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर संबधित अधिकारी / पदाधिकारी यांच्या करीता प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करुन अभियानाची उदिष्टे, भुमिका व जबाबदा-या याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक १२/०९/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता मत्सोदरी देवी संस्थान सभागृह अंबड येथे तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांनी दिली आहे

## पान १ वरून...

### ज्या वर्षाचा एफआरपी त्याच

मागील हंगामातील घटक विचारात घेतले जातात. त्यामुळे मागील हंगामातील साखर उताऱ्यानुसार चालू हंगामासाठी जाहीर केलेल्या एफआरपी दराप्रमाणे रक्कम अदा करणे योग्य होईल. अशी सूचना काही सदस्यांनी केली होती. मात्र याला विरोध दर्शवत एफआरपीच्या कायद्यात मागील हंगामाच्या साखर उताऱ्यानुसार एफआरपी दिली पाहिजे, असे कोठेच म्हटलेले नाही. केंद्र शासनाद्वारे एफआरपी ठरवून संबंधित हंगामासाठी परिपत्रक काढतानाही त्यात उल्लेख नसतो. असे स्पष्टीकरण देण्यात आले. शेवटी अजित पवार यांनी साखर उद्योगासमोरील अडचणी लक्षात घेता ज्या वर्षाची एफआरपी त्याच वर्षाचा साखर उतारा धरून पैसे अदा करण्याबाबत अध्यादेश काढण्याबाबत विचार करावा, असे म्हटले.

-----------

### लातूरच्या तरुणाची

सर्वांचे प्रयत्न निष्फळ ठरले. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. भरत कराड यांनी आत्महत्यापूर्वी लिहिलेल्या चिट्ठीत, ''मी ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनात सहभागी झालो. तरीही सरकारने ओबीसींचा घात करुन जीआर काढला. त्यामुळे मी जीवन संपवत आहे, माझ्या बलिदानानंतर तरी समाजाला न्याय मिळावा'' असे त्यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमूद केले आहे.

**अंत्यसंस्कारावेळी घोषणाबाजी**

भरत कराड यांच्या अंत्यसंस्कारावेळी गाव आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''ओबीसींना आरक्षण मिळालेच पाहिजे'', ''भरत कराड यांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही'' अशा घोषणा देत वातावरण संतप्त झाल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, भरत यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली व एक मुलगा असा परिवार असून कराड यांच्या निधनामुळे कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले आहे.

-----------------

### मराठा आरक्षणाची लढाई

एक नाही, तसेच मराठा समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास नाही, हे यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. असे असतानाही सरकारने मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. सरकारचा हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करणारा असल्याचे याचिकेत म्हटले आहे. ही अधिसूचना राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या दबावाखाली येऊन काढली आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या संधी हिरावून घेतल्या जातील. तसेच, हे आरक्षण राज्यातील एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडते आणि ते असंवैधानिक आहे, असा युक्तीवाद देखील करण्यात आला आहे. सरकारचा हा निर्णय भेदभावपूर्ण, मनमानी आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करणारा आहे. राजकीय स्वार्थासाठी तुष्टीकरणाचे राजकारण करत ही अधिसूचना काढण्यात आली असल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकांवर उच्च न्यायालय लवकरच सुनावणी घेण्याची शक्यता आहे. याचिकाकर्त्यांनी या याचिका प्रलंबित असेपर्यंत अधिसूचनेच्या अंमलबजावणीला स्थगिती देऊन कोणालाही कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, अशी अंतरिम मागणी केली आहे.

-------------

### बीडमध्ये २३ दिवसात ३ अधिकाऱ्यांच्या

येथील विस्तार अधिकाऱ्याने जीवन संपविल्याची घटना उघडकीस आली आहे. जिल्ह्यात मागील २३ दिवसांत या तिन्ही घटनांमध्ये सरकारी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी जीवन संपवले आहे. परळी तालुक्यातील शिवाजीनगर परिसरात पंचायत समितीमधील विस्तार अधिकारी विलास डोंगरे हे आधी परळी येथे ग्रामपंचायतमध्ये ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांचे प्रमोशन होऊन ते बीड पंचायत समितीमध्ये विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. आत्महत्येचे कारण अद्याप समजलेले नाही.

------

### तहसीलदाराच्या अंगावर ट्रॅक्टर

आला. दरम्यान तहसीलदारांनी देखील ४० किलोमीटरचा पाठलाग करत वाळूने भरलेले ट्रॅक्टर जप्त करण्याची कारवाई केली आहे. अंबड तालुक्यात मागील काही दिवसापासून वाळू माफियांचा धुमाकूळ सुरूच असून सर्रासपणे बेकायदेशीररित्या वाळू उपसा करून अवैधरित्या वाळूची वाहतूक करत आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने मागील काही दिवसापासून या विरोधात धडक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांनी अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र तहसीलदार यातून थोडक्यात बचावले असून जवळपास ४० किलोमीटरचा पाठलाग करत हा ट्रॅक्टर त्यांनी जप्त केला आहे. अंबड तालुक्यातील पारनेर तांडा ते कर्जत पर्यंत हा पाठलागाचा थरारक प्रसंग सुरू होता. या मोहिमेत अनेक कारवाया करत ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत. तर या घटनेनंतर पुन्हा तहसीलदारांचे पथक कारवाईसाठी गेले होते.

--------------

### गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे

उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. आचार्य देवव्रत हे सध्या गुजरातचे राज्यपाल असून यापूर्वी त्यांनी हिमाचल प्रदेशच्या राज्यपाल पदाची जबाबदारीही सांभाळली आहे. ते मूळचे हरियाणाच्या पानिपत जिल्ह्यातील आहेत.

---------

### राज्यातील ३४ हजार शिक्षकांच्या

पात्र होतात. त्यासाठी या शिक्षकांना प्रशिक्षण घ्यावे लागते. या प्रशिक्षणादरम्यान आणि नंतरही त्यांच्या चाचण्या होतात. या चाचण्या उत्तीर्ण झाल्यावरच त्यांना प्रमाणपत्र दिले जाते आणि वेतनश्रेणीत बदल होतो. यंदा राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालयांमधील ४० हजार ८१ शिक्षकांनी वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ३९ हजार ८४१ शिक्षक प्रशिक्षणासाठी पात्र ठरले होते. या पात्र शिक्षकांचे प्रशिक्षण विविध टप्प्यांमध्ये आणि विविध तुकड्यांमध्ये झाले. या प्रशिक्षणादरम्यान ५ हजार ५२७ शिक्षक अनुत्तीर्ण होते, तर ३४ हजार ३१४ शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण केले. त्यापैकी ३३ हजार ५७२ शिक्षक प्रशिक्षणादरम्यान घेतलेल्या चाचण्यांमध्ये उत्तीर्ण झाले. तर अद्याप ५६३ शिक्षकांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. दहावी-बारावीची परीक्षा सुरू असतानाच शालेय शिक्षण विभागाने आयोजित केलेले वरिष्ठ आणि निवड श्रेणीचे प्रशिक्षण हजारो शिक्षकांनी पूर्ण करूनही त्यांना प्रमाणपत्रच मिळाले नव्हते. प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी घाई करणाऱ्या शिक्षण विभागाने प्रमाणपत्रे देण्यात मात्र दिरंगाई केल्याने नाराज झालेल्या तब्बल ३४ हजार शिक्षकांना आता पुढील आठवड्याभरात ही प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत.या शिक्षकांना उत्तीर्ण होऊनही अद्यापही प्रमाणपत्र न मिळाल्याने शिक्षक वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव शिक्षण विभागाकडे पाठवू शकले नाहीत. त्यामुळे शिक्षकांचे मोठे नुकसान झाले. मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे उत्तर विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी हे प्रकरण एससीईआरटीच्या संचालकांच्या निदर्शनास आणून देत शिक्षकांना तातडीने प्रमाणपत्रे देण्यात यावीत, अशी विनंती केली. या विनंतीनंतर आता पुढील आठवड्याभरात पात्र शिक्षकांना प्रमाणपत्रे मिळणार असल्याची ग्वाही एससीईआरटीने दिली आहे.

-------------

### आगोदर मुलीला संपवले

घटनास्थळी ग्रामीण पोलीस दाखल झाली होती. बीड शहरापासून काही अंतरावर असलेल्या इमामपूर रोड परिसरात जयराम बोराडे यांने ९ सप्टेंबर रोजी गळफास घेवून आत्महत्या केली होती. याची माहिती पोलीस प्रशासन आणि त्याच्या नातेवाइकांना झाल्यानंतर घटनास्थळी पोलीस व नातेवाईक दाखल झाले होते. जयराम याच्या सोबत त्याची ४ वर्षीय मुलगी अक्षरा बोराडे असल्याचे समोर आले होते. अक्षरा बोराडे ही नेमकी कोठे आहे. याचा शोध घेतला जात होता. पोलीस प्रशासनाने मुलगी आढळून आल्यास संपर्क करण्याचे आवाहन केले होते. मात्र दुर्देवी घटना अशी की, या मुलीचा मृतदेह आज सकाळी बीड पासून जवळ असलेल्या रामगड शिवरातील एका लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. जयराम बोराडे यांने आधी मुलीला फाशी देवून नंतर इमामपूर रोडवर जावून आत्महत्या केली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मुलीला मारुन स्वतः जयराम बोराडे यांने आत्महत्या का केली? या प्रकरणाचा तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहे.

-------------

### फिजिओथेअरपिस्टना आता 'डॉक्टर'

नागरिकांची दिशाभूल होते. त्या पुढे म्हणतात, फिजिओथेरपिस्टना प्राथमिक वैद्यकीय प्रॅक्टिस करण्याची परवानगी नाही. त्यांनी फक्त रेफर केलेले पेशंटवरच उपचार करायचे आहेत. त्यांना मेडिकल कंडिशनचे निदान करण्याचे प्रशिक्षण मिळालेले नाही. यामुळे वैद्यकीय गुंतागुंत होऊ शकते. या पत्रात यापूर्वी विविध न्यायलयांनी दिलेल्या आदेशांचा देखील दाखला देण्यात आला आहे. यात पटना, मद्रास उच्च न्यायालयांच्या आदेशांचा दाखला देण्यात आला आहे. याचबरोबर मेडिकल काऊन्सील ऑफ इंडियाने देखील फिजिओथेरपिस्ट किंवा ऑक्युपेशनल थेअरपिस्ट यांना डॉक्टर ही उपाधी वापरण्यास मनाई केली आहे. एप्रिल महिन्यात नॅशनल कमिशन फॉर अलाईड अँड हेल्थ प्रोफेशन्स (एनसीएएचपी) यांनी फिजिओथेअरपिस्ट हे डॉक्टर ही उपाधी लावू शकतात असे जाहीर केले होते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आखत्यारीत येत असलेल्या एनसीएएचपीने २०२५ मध्ये फिजिओथेअरपिस्ट करिक्युलम लॉंच केला होता. त्याचाच भाग म्हणून हा निर्णय घोषित करण्यात आला आहे.

-------------



आष्टी : तालुक्यातील डॉक्टर असोसिएशनने नामदार गिरीश महाजन व आ.सुरेश आण्णा धस यांचे मानलें आभार

**स्वामी विवेकानंद अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी. लि. बीड**

रजि. बीएचआर/बीएचआर/आरएसआर/एसआर/453/2022

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस)**

**संस्थेच्या** सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळवण्यात येते की, संस्थेच्या सभासदांची 4थी **वार्षिक सर्वसाधारण सभा** वार **रविवार** दि. 28/09/2025 रोजी **सकाळी ठीक** 11 वाजता, संस्थेचे मुख्य कार्यालय एच.पी.गॅस एजन्सी समोर, सटवाई मैदान, बीड येथे संस्थेच्या अध्यक्ष सौ. शिवकन्या अशोक राऊत यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे मुख्य कार्यालयाचे वरती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेत खालील विषयावर चर्चा, विचार-विनीमय करुन निर्णय घेण्यात येतील.

तरी संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय**

| | |
|---|---|
| विषय क्र. 1) | मागील सभा दिनांक 28/09/2024 रोजी झालेल्या वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिव्रत वाचून कायम करणे |
| विषय क्र. 2) | आर्थिक वर्ष 2023-2024 च्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे. |
| विषय क्र. 3) | आर्थिक वर्ष 2024-2025 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देणे. |
| विषय क्र. 4) | मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या 31/मार्च/2025 अखेरचे तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद या आर्थिक पत्रकांचे वाचन करणे व नफा वाटणी त्यास मान्यता देणे. |
| विषय क्र. 5) | आर्थिक वर्ष 2024-2025 या आर्थिक वर्षात झालेल्या जमा खर्चास मान्यता देणे |
| विषय क्र. 6) | आर्थिक वर्ष 2024-2025 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकापेक्षा कमी /जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे. |
| विषय क्र. 7) | आर्थिक वर्ष 2025-2026 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे. |
| विषय क्र. 8) | आर्थिक वर्ष 2025-2026 या आर्थिक वर्षा करीता वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे. |
| विषय क्र. 9) | आर्थिक वर्ष 2024-2025 यावर्षात झालेल्या नवीन सभासदांना व वार्षीक सभेपुर्वी झालेल्या नविन सभासदांना मान्यता देणे. |
| विषय क्र. 10) | आर्थिक वर्ष 2024-2025 या वर्षात संस्थेच्या काही सभासदांनी राजीनामे दिले असुन त्यांच्या राजीनाम्यास मान्यता देणे. सभासदत्व रदद करणे बाबत.. |
| विषय क्र. 11) | संस्थेच्या ठेवी व गुंतवणुकीस मान्यता देणे. |
| विषय क्र. 12) | उपनिबधक कार्यालय जा.क्र. 853/उपनि/वि-2/ना.ग्रा.वि.शे./कर्म.पत/अदर्श उपविधी/2025 दि.29/08/2025 नुसार संस्थेकरीता नविन अदर्श उपविधी स्विकारणे बाबत. |
| विषय क्र. 13) | वार्षीक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे. |
| विषय क्र. 14) | संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे बाबत.. |
| विषय क्र. 15) | संस्थेचे दिर्घकालीन व्यवसाय वाढीचे उदिष्ट अदयावत करण्यास मान्याता देणे. |
| विषय क्र. 16) | मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी येणा-या विषयावर निर्णय घेणे. |

दिनांक : 10/09/2025 — **मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**

स्थळ : बीड

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

सुचना : वार्षीक सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी 11 वाजेपर्यंत पुर्ण झाली नाही तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकलेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी 11.30 वाजता मुळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदांना नम्र सुचना**

1) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/ सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी दि. 22/09/2025 रोजी पर्यंत कामकाजाचे वेळेत नोंदणीकृत कार्यालयात लेखी स्वरुपात दयाव्यात.

2) सभेची नोटीस सभासदांचे व्हाटसॲप क्रमांकावर पाठवण्यात आली आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १२ सप्टेंबर २०२५



## महादेव वस्ती शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडी जाहीर

अंमळनेर । प्रतिनिधी



दिनांक १०/०९/२०२५ रोजी जि.प.प्रा.शा. महादेव वस्ती केंद्र अमळनेर तालुका पाटोदा जिल्हा बीड येथे शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यात आली.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून बेदरे ज्ञानदेव विष्णू व उपाध्यक्ष म्हणून पोकळे आजिनाथ विष्णू यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.बैठकीस केंद्राचे केंद्रप्रमुख उकांडे सर मुख्याध्यापक तावरे,सहशिक्षक अनारसे,सरपंच महेश दादा खेंगरे,ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब बेदरे हे उपस्थित होते.

## ईपीएस ९५ पेंन्शनरांचा नागपूर येथे राज्यस्तरीय मेळावा

बीड । प्रतिनिधी

निवृत्त कर्मचारी १९९५ राष्ट्रीय समन्वय समिती ,नवी दिल्ली च्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश येंडे व राष्ट्रीय महासचिव प्रकाश पाठक यांच्या मार्गदर्शना खाली रविवार दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता परवाना भवन, ४४ किंग्ज हॉस्पिटल कॉम्प्लेक्स ,बँक ऑफ इंडिया जवळ, नागपूर ४४०००१ येथे आयोजित केला आहे. मेळाव्यात भगतसिंह कोशायारी कमिटी अहवाल १४७ नुसार किमान वेतन ९ ००० व त्यावरील महागाई भत्ता देण्यात यावा, दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ व ४ नोव्हेंबर २०२२ च्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे विना भेदभाव पूर्ण पगारावर पेन्शन लागू करण्यात यावी, विधवा पेन्शन १००% देण्यात यावी यासह आदी मागण्या बाबत मोहन शर्मा, प्रकाश येंडे, प्रकाश पाठक,भीमराव डोंगरे, पुंडलिक पांडे, दादा झोडे, प्रभाकर खोंड आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार असून त्यावर विचार मंथन होणार आहे. कार्यक्रमानंतर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी मराठवाडा विभागातील तसेच बीड जिल्ह्यातील ईपीएस ९५ पेन्शन धारकांनी राज्यस्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निवृत्त कर्मचारी १९९५ राष्ट्रीय समन्वय समितीचे मराठवाडा विभागीय संघटक तथा बीड जिल्हाअध्यक्ष डॉ. संजय तांदळे सचिव डी. आर. शेवलीकर,सुदाम कोळेकर, भाऊसाहेब फुंदे ,रणजीत डावकर, सुधीर देशमुख आदींनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास शिवसेनेवरच-पटवर्धन

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनतेच्या पूर्ण आवाजाला सत्तेत आणण्यासाठी संघटितपणे काम करत आहोत. एकनाथ शिंदे हे विरोधकांना पराभूत करुन जनतेच्या हिताचे कार्य पुढे नेत आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास शिवसेनेवरच राहणार असल्याचा विश्वास शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी व्यक्त केला तर महाराष्ट्रातील जनता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच



पाठीशी असून जनतेची सेवा हीच शिवसेनेची खरी ताकद असल्याचे संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील माळीवेस भागातील हनुमान मंदिरात दि.११ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर तसेच पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना संपूर्ण ताकदीने प्रत्येक मतदारापर्यंत जाऊन जनतेच्या समस्यांचे सखोल निराकरण करण्यासाठी कटिबद्ध आहे. निवडणुकीत जनतेच्या अपेक्षा आणि विकास कार्य या मुद्यांवर शिवसैनिकांनी फोकस करावा. विकास कार्यात स्थिरता आणण्याचे शिवसेनेचे लक्ष्य आहे. कोणत्याही वादावर नव्हे, तर परिणामकारक कामावर शिवसैनिकांनी भर द्यावा असे ते म्हणाले. संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी या बैठकीत स्पष्ट केले की, शिवसेना हा जनतेच्या आवाजाचा खरा पक्ष आहे.आगामी निवडणुकीत कार्यकर्त्यांनी सजगपणे जनतेशी संपर्क साधून प्रचारकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हाभरातील पदाधिकारी, महिला पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.


### प्रभावी प्रचार आणि रणनितीची आखणी

बैठकीत बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक व स्वप्नील गलधर यांनी स्पष्ट मार्गदर्शन करत प्रभावी प्रचार रणनिती ठरवली. निवडणुकीत शिवसेना संपूर्ण ताकदीने जनतेच्या विकासाचे प्रश्न व ठोस धोरणांचा मुद्दा समोर ठेवून यश मिळविण्यास सज्ज असल्याचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर म्हणाले. यावेळी स्थानिक समस्यांवर आधारित प्रत्येक मतदाराशी संपर्क साधण्याचे, ठिकठिकाणी प्रचार सभा आयोजित करण्याचे आणि स्थानिक विकास प्रकल्पांविषयी जनतेपर्यंत पोहोचण्याचे ठोस उपाय आखले गेले. शिवसैनिकांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त करत प्रत्येक ठिकाणी प्रचारक अभियानाचे तंत्र वापरून मतदानाच्या क्षणापर्यंत जनतेपर्यंत पोहोचण्याचा संकल्प केला.

## सर्वसामान्य जनताच फेक असल्याने लढायचं कुणासाठी?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात असंख्य प्रश्न आहेत. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दयनीय अवस्था, शेतकऱ्यांचे हाल, बेरोजगारी, आरोग्याची बिकट परिस्थिती पण सर्वसामान्य जनता मात्र गप्प बसलेली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या जनतेला या प्रश्नांचा रोज सामना करावा लागतो, तीच जनता बोलायला किंवा उभे राहायला तयार नाही सामाजिक कार्यकर्ते आणि



विरोधी पक्षाचे नेते प्रश्नांसाठी सतत आवाज उठवत शासन-प्रशासनाला धडक देत आहे. पण जनतेचा पाठिंबा कुठे आहे? गावोगावी लोक फक्त चर्चा करतात, पण कृतीत मात्र शून्य! भीतीपोटी किंवा स्वार्थापोटी जनता मौन बाळगते आणि निवडणुकांच्या वेळी पुन्हा त्याच लोकांना निवडून देते, ज्यांच्या काळात हे प्रश्न निर्माण झाले.मग प्रश्न उपस्थित होतो ''लढायचं कुणासाठी? जे स्वतःच्या हक्कासाठीही उभं राहात नाहीत, त्यांच्यासाठी कार्यकर्त्यांनी किती लढायचं?''पाटोद्यात प्रश्नांचे डोंगर आहेत, कार्यकर्त्यांचे इरादे प्रामाणिक आहेत, पण जनता जर अशीच निष्क्रिय राहिली, तर पाटोदा तालुक्याच्या विकासाला आणखी किती वर्षे अन्याय सहन करत गप्प बसावे लागेल, हा असा मोठा प्रश्न आहे!

## लईख युसूफ शेखचा मातृभूमी प्रतिष्ठान कडून हृदयी सत्कार



बीड । प्रतिनिधी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. यात जल अभियंता (वॉटर इंजिनियर) परीक्षेत लईख युसूफ शेख ने उज्वल यश प्राप्त केले. या निमित्ताने ज्येष्ठ सामाजिक कार्यर्क्ते तथा मातृभूमी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी त्याच्या निवासस्थानी जाऊन हृदयी सत्कार केला.

## बेकायदेशीर लोकांची नावे कमी करण्याचे प्रशासनाचे आश्वासन

माजलगाव । प्रतिनिधी

धारूर येथे भूमाफियांच्या घशात अडकलेल्या मस्जिद मुलानी व गुलजार देवस्थानची विरासत तात्काळ मुक्त करून यावर लागलेल्या बेकायदेशीर लोकांचे नावे कमी करण्यात यावे.त्याचप्रमाणे देवस्थानच्या जमिनी हडपणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी नसता.गुरुवारी दि.११ सप्टेंबर रोजी आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा आंबेडकरी मोर्चाच्या वतीने मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिला होता.याची दखल घेत प्रशासनाकडून संबंधित भूमापियांना नोटीसी काढण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले असल्याची माहिती सय्यद सलीमबापू यांनी सांगितली.

धारूर येथील सव्र्हे नं.२० क्षेत्रफळ २१ एकर ०६ गुंठे,सर्व्हे नं.६९ क्षेत्रफळ २५ एकर ३७ गुंठे सव्हे नं. ७७ क्षेत्रफळ २३ एकर ०८ गुंठे यातील मस्जित मुलानी व गुलजार देवस्थानची जमीन आहे व सदरील जमीनीबाबत त्याचे मुळ इनामदार मयत सय्यद निजामोद्दीन पि.सय्यद कादर हे आहेत.या सर्व्हे नंबर बाबत काही लोकांनी महसुल अधिकाऱ्यांशी संगणमत करुन व बोगस वारस प्रमाणपत्र व बोगस वाटणीपत्र करुन वरील सर्व्हे नंबरच्या ७/१२ ला त्यांची नावे लावलेली आहेत.तसेच सदरील सर्व्हे नंबर बाबत व्यक्ती जिवंत असतांना १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर वाटणीपत्र करुन बेकायदेशीररित्या महसुल अधिकाऱ्याला हाताला धरुन बोगस फेरफार घेतलेले आहेत.७/१२ पत्रकाला बोगस लावलेली नावे कोणत्या आधारे लावली आहेत.याची चौकशी व्हावी.असे न झाल्यास गुरुवार दि.११ सप्टेंबर रोजी उपोषणाचे निवेदन सलीमबापू यांनी विभागीय अधिकाऱ्यांना दिले होते.याची दखल उपविधिकाऱ्यांनी घेतली.दरम्यान महसूल कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू असल्याने उपोषण न करण्याचे विनंती सलीमबापू यांना करण्यात आली.व सदरील प्रकरणी धारूर येथील मस्जिद मुलानी व गुलजार देवस्थानची विरासत सुरु करुन चौकशीअंती बेकायदेशीर लोकांची नावे कमी करण्याचे व या प्रकरणात हेरिंग घेण्यात येणार असल्याचे व संबंधित प्रकरणातील व्यक्तींना नोटीसा काढण्यात येणार असल्याचे प्रशासना कडून आश्वासन देण्यात आले.अशी माहिती उपोषण करते सय्यद सलीमबापू यांनी दिली आहे.यामुळे गुरुवार दि.११ सप्टेंबर रोजी उपविभागीय कार्यालयासमोर करण्यात येणारे उपोषण स्थगित करण्यात येत आहे असेही त्यांनी सांगितले.


**CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED**

REGD OFF: 618/2, CHAKLAMBA TAL-GEORAI, BID, BEED, MAHARASHTRA, INDIA, 431127

CIN: U74995MH2017PLC299008

Email: chatrapatiurbanmh23@gmail.com

**Public Notice**

(Pursuant to section 20 read with Section 96 and Section 101 of the Companies Act, 2013)

NOTICE is hereby given that the 8th Annual General Meeting of the Members of CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED will be held on Tuesday, the 30th day of September, 2025 at 11:00 AM at the registered office of the company situated at 618/2, CHAKLAMBA TAL- GEORAI, BID, BEED, MAHARASHTRA, INDIA, 431127 to transact the following business:

**ORDINARY BUSINESS:**

1. To consider and adopt the Financial Statements and Board Report with annexure for 31/03/2025. 2. To consider retirement by rotation of Director and re-appointment thereof.

**SPECIAL BUSINESS:**

To consider and if thought fit to pass the following resolutions:

3. To consider and approve the increase in Authorized share capital of the Company. 4. To consider and approve Directors remuneration.

A copy of notice along with the explanatory statement is affixed on the notice Board of the Company. The same can be delivered to the member on request and payment of fees. In case of any queries, members may contact registered office of the Company.

BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS
FOR CHATRAPATI URBAN NIDHI LIMITED

SD/-
**ROSHAN CHHAJED**
DIRECTOR
DIN: 08011364

PLACE: BEED

**NOTES:**

•A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member of the company.

•Proxies in order to be effective must be lodged with the company at its registered office at least 48 hours before the time appointed for the meeting



**मिराई नागरी सहकारी पंतसंस्था मर्यादित, बीड**

रजि. बीएचआर/बीएचआर/आरएसआर/एसआर/467/2023

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस)**

**संस्थेच्या** सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळवण्यात येते की, संस्थेच्या सभासदांची 3री **वार्षिक सर्वसाधारण सभा** वार **रविवार दि.** 28/09/2025 रोजी **सकाळी ठीक** 11 वाजता, संस्थेचे मुख्य कार्यालय हरीओम कॉम्प्लेक्स, पांगरी रोड, अंबिका चौक, बीड येथे संस्थेचे अध्यक्ष श्री. रघुनाथ जगन्नाथ खरसाडे यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे मुख्य कार्यालयाचे वरती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेत खालील विषयाबर चर्चा, विचार-विनीमय करुन निर्णय घेण्यात येतील.

तरी संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय**

| | |
|---|---|
| विषय क्र. 1) | मागील सभा दिनांक 28/09/2024 रोजी झालेल्या वार्षीक सर्वसाधारण सभेचे इतिव्रत वाचून कायम करणे |
| विषय क्र. 2) | आर्थिक वर्ष 2023-2024 च्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे. |
| विषय क्र. 3) | आर्थिक वर्ष 2024-2025 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देणे. |
| विषय क्र. 4) | मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या 31/मार्च/2025 अखेरचे तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद या आर्थिक पत्रकांचे वाचन करणे व त्यास मान्यता देणे. |
| विषय क्र. 5) | आर्थिक वर्ष 2024-2025 या आर्थिक वर्षात झालेल्या जमा खर्चास मान्यता देणे |
| विषय क्र. 6) | आर्थिक वर्ष 2024-2025 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकापेक्षा कमी /जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे. |
| विषय क्र. 7) | आर्थिक वर्ष 2025-2026 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे. |
| विषय क्र. 8) | आर्थिक वर्ष 2025-2026 या आर्थिक वर्षा करीता वैधानिक लेखा परीक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे. |
| विषय क्र. 9) | आर्थिक वर्ष 2024-2025 यावर्षात झालेल्या नवीन सभासदांना व वार्षीक सभेपुर्वी झालेल्या नविन सभासदांना मान्यता देणे. |
| विषय क्र. 10) | आर्थिक वर्ष 2024-2025 या वर्षात संस्थेच्या काही संभासदांनी राजीनामे दिले असुन त्यांच्या राजीनाम्यास मान्यता देणे. सभासदत्व रदद करणे बाबत.. |
| विषय क्र. 11) | संस्थेच्या ठेवी व गुंतवणुकीस मान्यता देणे. |
| विषय क्र. 12) | उपनिबंधक कार्यालय जा.क्र. 853/उपनि/वि-2/ना.ग्रा.वि.शे./कर्म.पत/अदर्श उपविधी/2025 दि.29/08/2025 नुसार संस्थेकरीता नविन अदर्श उपविधी स्विकारणे बाबत. |
| विषय क्र. 13) | वार्षीक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे. |
| विषय क्र. 14) | संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे बाबत.. |
| विषय क्र. 15) | संस्थेचे दिर्घकालीन व्यवसाय वाढीचे उदिष्ट अदयावत करण्यास मान्याता देणे. |
| विषय क्र. 16) | मा. अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी येणा-या विषयावर निर्णय घेणे. |

दिनांक : 10/09/2025 — **मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**

स्थळ : बीड

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सुचना :** वार्षीक सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी 11 वाजेपर्यंत पुर्ण झाली नाही तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकलेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी 11.30 वाजता मूळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदांना नम्र सुचना**

1) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/ सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी दि. 22/09/2025 रोजी पर्यंत कामकाजाचे वेळेत नोंदणीकृत कार्यालयात लेखी स्वरुपात दयाव्यात.

2) सभेची नोटीस सभासदांचे व्हाटसअ‍ॅप क्रमांकावर पाठवण्यात आली आहे.



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-५३५ दिनांक-११/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नारायण सुर्यभान बोंगाणे रा. शेवगा ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या आई जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तुळसाबाई सुर्यभान बोंगाणे | आई | १९/०४/१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-५३४ दिनांक-११/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नारायण सुर्यभान बोंगाणे रा. शेवगा ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या वडील जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुर्यभान हरीबा बोंगाणे | वडील | १९/०६/१९८७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३५० दिनांक-२६/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती चाँदपाशा शकील शेख रा. शहागड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमन चाँदपाशा शेख | मुलगी | ०२/०७/२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २६/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३५० दिनांक-२९/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती चाँदपाशा शकील शेख रा. शहागड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आनस चाँदपाशा शेख | मुलगी | १२/०८/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३७१ दिनांक-०१/०९/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शिरीन रफीयोद्दीन शेख रा. अंबड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिरीन रफीयोद्दीन शेख | स्वत: | ०२/०४/१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०१/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-४४२ दिनांक-२९/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शाम रोहिदास खरात रा. वडीकाळ्या ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राणी शाम खरात | मुलगी | १७/०६/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-३३२ दिनांक-२८/०८/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुजीब मुन्शी शेख रा. ताडहदगाव ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आलीशा मुजीब शेख | मुलगी | २४/०२/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


cmyk

# ऊसतोड मजूर वळला रेशीम शेती व्यवसायाकडे

आमची माती आमची माणसं
सुभाष चौरे (९४२३१७१७२८)

**बीड जिल्हा हा ऊसतोड मजुराचा जिल्हा म्हणून राज्यात ओळख आहे आता ही ओळख हळूहळू पुसत चालली आहे ऊसतोड मजूर हा सिंचन क्षेत्र वाढल्यामुळे बागायतदार झाला आहे मात्र तरीही ऊसतोड करणारी कुटुंबीय आणखी म्हणावे तेवढे कमी झाली नाही परंतु रेशम शेतीच्या माध्यमातून शेतकरी आता आपल्या नव्या वळणावर लागला असून बीड जिल्ह्यातील ५७ एकर वर तुतीची लागवड केली जात असून जवळपास ४५४१ शेतकऱ्यांनी आपला ऊस तोडीचा व्यवसाय बाजूला ठेवत रेशीम शेतीकडे वळल्याने भविष्यामध्ये रेशम पुरवणारा जिल्हा अशी ओळख निर्माण होईल यात शंका नाही.**

तुतीची लागवड आणि त्यातून रेशीम कोष तयार करणे किंवा त्यापुढील प्रक्रिया रेशमी धागा तयार करणे ही सर्व प्रक्रिया आंध्र प्रदेश कर्नाटक पश्चिम बंगाल या भागामध्ये मोठ्या प्रमाणात होते मात्र आता महाराष्ट्रात रेशीम उद्योग महामंडळाच्या माध्यमातून तुती लागवड आणि रेशीम उद्योग हळूहळू मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे चित्र दिसत आहे त्यातही बीड जिल्ह्यामध्ये बाजार समितीच्या माध्यमातून रेशीम कोष खरेदी आणि रेशीम उद्योग महामंडळाच्या माध्यमातून तुती लागवडीस प्रोत्साहन करणारी यंत्रणा जिल्ह्यात असल्यामुळे आणि या रेशम शेतीमधून मोठ्या उत्पन्न मिळत आहे हे उत्पन्न ऊस कापूस सोयाबीन यापेक्षा अधिक प्रमाणात आहे तुती लागवडीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटल्यानंतर आणि खरेदीची व्यवस्था बीडमध्येच असल्याने शेतकऱ्यांना अधिक तुपाची भावही मिळत आहे आणि लागलीच त्यांच्या खात्यावर पैसेही जमा होत असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणात तुती लागवडीकडे वळला आहे वृक्ष लागवडीच्या उपक्रमामध्ये तुती लागवड हा उपक्रम समाविष्ट केल्यामुळे रोहियो अंतर्गत याला मदत ही मिळते याशिवाय शेतकऱ्यांना अनुदानही मिळत असल्याने शेतकरी या उद्योगाकडे मोठ्या प्रमाणात वळाला असल्याचे दिसत आहे बीड जिल्ह्यात ५७१ वर ही लागवड केली आहे एकरी तीन लाख रुपयाचे उत्पन्न यातून अपेक्षित असते प्रामुख्याने चुकीची लागवड केल्यानंतर त्यासाठी गांधी चाळ याप्रमाणे एक शेड उभा करून रेशीम किडे आणि तुतीचे पाणी त्यावर टाकले जातात मग हा रेशम खेडा कोश तयार करतो आणि हा कोश बाजारपेठेमध्ये विकला जातो प्रामुख्याने साडेसहा ते सातशे प्रति किलो दराने खरेदी केला जातो प्रामुख्याने मनरेगा मधून चार लाखापर्यंत अनुदान देखील याच्यासाठी दिले जाते उत्पन्न मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकरी मोठ्या संख्येने तुती लागवडीकडे वळू लागला आहे जो बीड जिल्ह्यातील शेतकरी ऊस तोडीसाठी बाहेर जिल्ह्यात जात होता आता त्याच ऊसतोड मजूर आला तुती रेशीम उद्योगाची गोडी लागल्याने तो या शेतीकडे वळला आहे धारूर आणि वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यामध्ये बहुतांशी ऊसतोड मजूर आता तुतीची लागवड करत असल्याने त्यांचा आदर्श परिसरातील शेतकरी घेताना दिसत असल्याची माहिती रेशीम कोश अधिकारी शंकर भगवान वराड यांनी दिली विशेषता तुती लागवडीसाठी प्रोत्साहन देणे कोश तयार झाल्यानंतर त्याची खरेदी करणे तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या रेशीम कोषाला योग्य भाव मिळवून देणे यासाठी रेशीम कोष अधिकारी आणि कार्यालयाचे मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळते विशेष म्हणजे बाजार समितीच्या परिसरामध्येच रेशीम कोष खरेदी केंद्र असल्याने शेतकऱ्यांना कर्नाटक आंध्र प्रदेश किंवा पश्चिम बंगाल इतर दुसऱ्या राज्यात जाण्याची गरज लागत नाही त्यामुळे आता ऊस कापूस सोयाबीन याच्या जोडीलाच आता शेतकरी तुती मधून रेशीम उद्योगाकडे वळल्याचे दिसत आहे आणि ही बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बाब म्हणावी लागेल.





## रेशम आपल्या दारी उपक्रम

रेशीम कोष कार्यालयामार्फत चालू वर्षांमध्ये शेतकऱ्यांना तुतीची लागवड रेशीम कोष तयार करणे त्याची विक्री आणि त्याचा भाव यासाठी मिळणारे अनुदान या सर्व प्रक्रियेची माहिती देण्यासाठी रेशम अधिकारी वराड यांच्या संकल्पनेमधून रेशीम आपल्या दारी हा उपक्रम बीड जिल्ह्यामध्ये राबवला जाणार आहे.

रेशम आपल्या दारी या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आणि थेट बांधावर जाऊन शेतकरी मिळावे त्यामधून तुती लागवडीचे महत्त्व रेशम कोषला मिळणारा भाव आणि त्याची खरेदी या सर्व किचकट बाबी शेतकऱ्यांना ही टीम समजून सांगणार आहे या कामासाठी मनरेगा मधील तेरा कर्मचारी आणि रेशीम कोष कार्यालयातील पाच असे १८ कर्मचारी व अधिकारी शेतकऱ्यांना तुती लागवडीचे महत्त्व समजून सांगणार आहेत रेशम आपल्या दारी या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना मिळणारे उत्पन्न आणि त्याची प्रक्रिया हे सर्व समजून घेण्यासाठी चांगला पर्याय आहे याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान रेशीम कोश अधिकारी शंकर भगवान वराट यांनी केले आहे.

## कर्नाटक नव्हे बीड बनतेय, रेशीम कोष खरेदीचे मार्केट

देशामध्ये रेशीम कोष खरेदीचे मार्केट फक्त कर्नाटक पश्चिम बंगाल आणि आंध्र प्रदेश या ठिकाणी होते आता गुजरातमध्ये देखील सुरू आहेत प्रामुख्याने महाराष्ट्रात रेशीम कोष खरेदी केंद्र याच ठिकाणी असल्याने शेतकऱ्यांना विक्रीसाठी परराज्यात जावे लागत होते त्यासोबतच खरेदी कधी होणार त्याला भाव किती मिळणार याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना करावा लागत होती परंतु आता बीड बाजार समितीच्या आवारामध्येच रेशीम कोष खरेदी होत असल्याने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ही चांगली आणि आनंदाची बाब म्हणावी लागेल विशेष म्हणजे हा कोश महामंडळात सोबतच कर्नाटक आंध्र प्रदेश गुजरात आदी भागातील व्यापारी स्वतः बीडमध्ये येऊन रेशीम कोष खरेदी करतात विशेष म्हणजे या ठिकाणचे काही बडे व्यापारी बीडमध्ये मुक्कामी असतात ऑगस्ट १ ते १० या दहा दिवसांच्या कार्यकाळामध्ये १०० क्विंटल पेक्षा अधिक रेशीम कोष खरेदी झाली आहे त्यामुळे कर्नाटक आंध्र प्रदेश पश्चिम बंगाल नव्हे तर बीड रेशीम कोष खरेदीचे मार्केट बनत आहे.

## ५७०० एकरवर तुतीची लागवड

बीड जिल्ह्यातील ४५४१ शेतकऱ्यांनी तुती लागवडीत सहभाग घेतला प्रामुख्याने आज ५७०० करवर तुतीची लागवड करण्यात आली आहे विशेषता यातून एकरी तीन लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते असा अंदाज आहे आणि तो मिळालेला देखील आहे मागील काळामध्ये जवळपास चौदाशे ते पंधराशे मीटर रेशीम कोष तयार झाला आणि त्याची खरेदी देखील झाली आहे चालू वर्षांमध्ये २५२६ शेतकऱ्यांनी तुती लागवडी संदर्भात मंजुरी घेतली आहे जवळपास १६०० शेतकरी आहेत आता या सर्वांना रेशीम आपल्या दारी माध्यमातून तुती लागवड पोस्ट तयार करणे त्याची विक्री या संदर्भातील माहिती दिली जाणार आहे.







## वृक्ष लागवड मोहिमेत रेशमचा समावेश- भगवान वराट

बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने महसूल जिल्हा परिषद आरोग्य विभाग कृषी विभाग रोहयोग यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यामध्ये दहा कोटी वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे प्रामुख्याने या वृक्ष लागवडीच्या मोहिमेमध्ये चार कोटी तुती वृक्ष लागवडीचा समावेश करण्यात आल्याची माहिती रेशीम कोष अधिकारी भगवान वराट यांनी दिली. रेशीम को संदर्भात तुतीची लागवड त्यानंतर कोश तयार करण्यासाठी असणारी प्रक्रिया त्याला लागणारे कष्ट या संदर्भात वराट यांनी दैनिक राज्य लोकतंत्र बरोबर चर्चा करताना सांगितले की राज्य शासनाच्या माध्यमातून वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेण्यात आली बीड जिल्ह्यामध्ये दहा कोटी वृक्ष लागवड करणार आहेत त्यामध्ये रेशम म्हणजे तुती लागवडीचाही समावेश असून चार कोटी वृक्ष तुतीचे लावण्याचा संकल्प आहे त्यामुळे यातून मनरेगा मधूनही काही अनुदान दिले जाणार आहेत सोयाबीन ऊस कापूस या पिकाच्या जोडीला का तुती लागवड आली आहे कृतीही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना उत्पन्न देणारे पीक म्हणा की व्यवसाय म्हणा परंतु अधिक प्रमाणामध्ये उत्पन्न देणारे हे ठीक आहे तेव्हा शेतकऱ्यांनी तुतीकडे वळले पाहिजे या चालू आर्थिक वर्षामध्ये ४९९ मेट्रिक टन कोशाचे उत्पादन आणि खरेदी झाली जवळपास ६०० ते ७०० रुपये कशाला प्रति किलो भाव मिळाला पावसाळ्यामध्ये कशाचा भाव कमी होतो तरी देखील साडेतीनशे ते चारशे रुपये प्रति किलो भाव आपल्या खरेदी केंद्रावर मिळाल्याने शेतकरी समाधानी आहे दुसरी बाब म्हणजे शेतकऱ्यांना रक्कम मिळण्यासाठी चकरा मारण्याची गरज नाही ए पी एस एम मार्फत खरेदी झाल्यानंतर लागलीच शेतकऱ्यांच्या खात्यावर ती रक्कम वर्ग केली जाते सध्या कर्नाटक ही मुख्य बाजारपेठ आहे परंतु आता तेथीलच व्यापारी कोश खरेदीसाठी बीडमध्ये येत असल्याचे समाधान वराट यांनी व्यक्त केले.

## ७७ लाख रोप लागवडीचे उद्दिष्ट

बीड जिल्ह्यास १४०० एकर (प्रति एकर ५५०० रोपांची लागवड प्रमाणे) ७७.००लक्ष तुती रोपे लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे चालू आर्थिक वर्षामध्ये तुती लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यालयामार्फत रेशीम आपल्या दारी उपक्रम राबवला जाणार आहे त्यामधून शेतकरी प्रोत्साहित होतील याच माध्यमातून या कार्यालयाने जवळपास ७७ लाख स्तुती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे हे जर पूर्ण झाले तर बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एक नवे पर्व आले असे समजावे लागेल आजही शेतकरी फारसा तू तिकडे वळलेला दिसत नाही परंतु ज्या भागात तुतीची लागवड अधिक आहे त्या शेतकऱ्याला मिळणारे उत्पन्न पाहतात इतर शेतकरी तुतीच्या लागवडीकडे वळला असल्याचे दिसते



## केवळ पाच कर्मचाऱ्यावर चालतो जिल्ह्याचा कारभार

तुती लागवडीला शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे रेशीम कोष तयार करणे त्याच्या खरेदी आणि विक्रीची व्यवस्था शेतकऱ्यांना लावून देणे विशेषतः शेतकऱ्यांना तुती लागवडीपासून फायदे सांगणे शासनाकडून त्यांना मिळणारे अनुदान याची माहिती देणे या सर्व बाबी करण्यासाठी बीडमध्ये जिल्हा कार्यालय आहे या जिल्हा कार्यालयामध्ये अधीक्षकासह केवळ पाच कर्मचारी आहेत या पाच कर्मचाऱ्यांना जिल्ह्यातील कारभार पहावा लागतो ही शोकांतिका म्हणावी लागेल चालू वर्षात रेशम आपल्या दारी हा उपक्रम या कार्यालय मार्फत राबविला जाणार आहे त्यामुळे मनरेगांमधून तेरा कर्मचारी या उपक्रमात मदत करणार आहेत.

## कोषापासून रेशम धागा जिल्ह्यात चार प्रकल्प

बीड जिल्ह्यामध्ये तुती लागवड आणि रेशीम कोष तयार करणारे शेतकऱ्यांची संख्या आता दिवसेंदिवस वाढत आहे विशेषता कर्नाटक आंध्र प्रदेश गुजरात पश्चिम बंगाल इतर राज्यातील व्यापारी बीडमधून रेशीम कोष खरेदी करतात विशेष म्हणजे त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग आपल्याकडे हवेत यासाठी महामंडळाच्या मार्फत प्रयत्न सुरू आहेत रेशम कोषापासून धागा तयार करण्यासाठी जे काही प्रकल्प आहेत ते सध्या बीडमध्ये चार असून केज नेकनूर बीड या ठिकाणी सध्या रेशीम कोषापासून रेशीम धागा तयार करण्याचे प्रकल्प आहेत या प्रकल्पाची संख्या वाढवण्याचे प्रयत्न रेशीम कोषमंडळाच्या माध्यमातून सुरू आहेत या चार-पाच वर्षाच्या कालावधीमध्ये बीड जिल्ह्यामध्ये जवळपास १५ प्रकल्प उभे करण्याचा मानस रेशीम कोष अधिकारी शंकर भगवान वराट यांनी व्यक्त केला आहे प्रामुख्याने या प्रकल्प उभारणीला शासनाकडून ५० ते ६० टक्के पर्यंत अनुदान देखील दिले जाते. मात्र त्यासाठी काही खेळते भांडवल आवश्यक आहे हा प्रकल्प उभा करण्यासाठी दीड ते दोन कोटी रुपये लागतात.





## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६६ : आग्र्याहून सुटका झाल्यानंतर शिवाजीमहाराज राजगड येथे सुखरुप पोहोचले.
१७८६ : ब्रिटीश इस्ट इंडियाचे अधिकारी लॉर्ड कॉर्नवॉलिस हे भारताचे गव्हर्नर जनरल बनले.
१८५७ : कॅलिफोर्निया गोल्ड रश मध्ये सापडलेले १३-१५ टन सोने घेऊन जाणारे एस.एस. सेंट्रल अमेरिका हे जहाज सोने व ४२६ प्रवाशांसह बुडाले.
१८७३ : टाइपराइटर पहिल्यांदा ग्राहकांना विकण्यात आले.
१९१९ : अ‍ॅडॉल्फ हिटलर यांनी जर्मन वर्कर्स पार्टी मध्ये प्रवेश केला.
१९३० : विल्फ्रेड र्‍होड्स यांनी आपला शेवटचा म्हणजे १११० वा प्रथमश्रेणी क्रिकेट सामना खेळला.
१९४८ : भारतीय सैन्य हैदराबाद संस्थानच्या हद्दीत शिरले. जुलुमी रझाकारांच्या मदतीने स्वतंत्र राहण्याचा निजामाचा हट्ट मोडून या फौजांनी हैदराबाद ताब्यात घेतले. हैदराबाद मुक्तीच्या या कारवाईचे वर्णन 'पोलिस अ‍ॅक्शन' असे केले जाते.
१९५९ : 'ल्यूना-२' हे मानवविरहित रशियन अंतराळयान चंद्रावर उतरले.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी डार्डानेल्स खाडी पार केली.
१९८० : तुर्कस्तानमधे लष्करी उठाव
१९९८ : डॉ. जयंत नारळीकर यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार प्रदान
२००२ : मेटसॅट या भारताच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००५ : हाँगकाँगमधील डिस्नेलँड सुरू झाले.
२०११ : हल्ल्यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त एक समर्पण समारंभ पार पडल्यानंतर न्यूयॉर्क शहरातील स्मारक संग्रहालय सर्वांसाठी सुरु करण्यात आलं.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९४ : फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यांचा जन्म.
१६८३ : पोर्तुगालचा राजा अफोन्सो सहावा यांचा जन्म.
१७९१ : विद्युतशक्तीचे शास्त्रज्ञ मायकल फॅरेडे यांचा इंग्लंड येथे जन्म.
१८१८ : गॅटलिंग गन चे संशोधक रिचर्ड जॉर्डन गॅटलिंग यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८०३)
१८९४ : विभूतीभूषण बंदोपाध्याय जागतिक ख्यातीचे बंगाली साहित्यिक. 'पथेर पांचाली', 'अपराजित', 'आरण्यक' या त्यांच्या काही उत्कृष्ट कलाकृती होत. 'इच्छामती' या त्यांच्या कादंबरीला रविन्द्र पुरस्कार देण्यात आला. (मृत्यू: १ नोव्हेंबर १९५०)
१८९७ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ मार्च १९५६)
१९१२ : फिरोझ गांधी इंदिरा गांधी यांचे पती, पत्रकार व राजकारणी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९६०)
१९४८ : मॅक्स वॉकर ऑस्ट्रेलियन क्रिकेट आणि फूटबॉलपटू (मृत्यू:)
१९७७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू नेथन ब्रॅकेन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१८ : ऑस्ट्रेलियाचे चौथे पंतप्रधान जॉर्ज रीड यांचे निधन.
१९२६ : विनायक लक्ष्मण भावे मराठी साहित्य संशोधक, ग्रंथकार आणि 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी साहित्येतिहास ग्रंथाचे लेखक, १८९३ मध्ये त्यांनी ठाणे येथे मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना केली. (जन्म: १८७१)
१९५२ : रामचंद्र गणेश कुंदगोळकर तथा 'सवाई गंधर्व' हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे शिष्य, पं भीमसेन जोशी आणि गंगुबाई हनगळ यांचे गुरू, दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी दिली. (जन्म: १९ जानेवारी १८८६)
१९७१ : जयकिशन डाह्याभाई पांचाळ 'शंकर-जयकिशन' या संगीतकार जोडीतील संगीतकार (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते सतीश दुभाषी यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: १४ डिसेंबर १९३९)
१९८० : चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री शांता जोग यांचे मुंबई-गोवा महामार्गावर 'मंतरलेली चैत्रवेल' हे नाटक घेऊन चाललेल्या नाटक कंपनीच्या बसला लागलेल्या आगीत जळाल्याने निधन झाले. (जन्म: २ मार्च १९२५)
१९९२ : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ३१ डिसेंबर १९१०)
१९९३ : अमेरिकन अभिनेता रेमंड बर यांचे निधन.
१९९६ : पं. कृष्णराव रामकृष्ण चोणकर मराठी व गुजराती संगीत नाट्य सृष्टीतील गायक अभिनेते, एक तपाहून अधिक काळ 'गंधर्व नाटक मंडळी'मध्ये नटसम्राट बालगंधर्वांचे नायक म्हणून त्यांनी काम केले. (जन्म:)
१९९६ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा अ‍ॅटम बॉम्ब' असे छापले जात असे. (जन्म: ७ जुलै १९४८)

# सेवा पंधरवाडा सर्व कार्यक्रम यशस्वीपणे राबवा - भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती हा सेवा पंधरवाडा दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाने दिलेले सर्व कार्यक्रम महानगर जिल्ह्यात राबवून सेवा पंधरवाडा यशस्वी करा, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सेवा पंधरवाडा कार्यशाळा कार्यक्रमात बोलताना कार्यकर्त्यांना केले.

यावेळी व्यासपीठावर विधानसभेचे माजी आमदार मा. कैलास गोरंटयाल, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, सौ.विमलताई आगलावे, महानगर माजी जिल्हाध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, शुभांगीताई देशपांडे, अक्षय गोरंटयाल, सुनील खरे, संजय डोंगरे, महेश निकम, अमोल धानुरे, वसंत शिंदे, धनराज काबलीये, अर्जुन गेही, माजी सरचिटणीस देविदास देशमुख इत्यादी प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, दि.१७ सप्टेंबर रोजी जिल्हा व बूथ स्तरावर रक्तदान शिबिर, दि.१७ ते २४ सप्टेंबर आरोग्य शिबिर, दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनी, १८ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर पर्यंत रक्तदान शिबिर. १९ व २० सप्टेंबर रोजी पंतप्रधान यांच्या जीवनावर आधारित पुस्तक प्रदर्शन तसेच पुस्तकाचे वितरण जिल्हा स्तरावर करायचे आहे. २२ ते २३ सप्टेंबर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेष पुष्पांजली तसेच एक पेड मा के नाम, कार्यकर्त्यांच्या घरी स्नेह भोजन हा कार्यक्रम बूथ स्तरावर घेणे, तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन व कार्य, विकसित भारत आत्मनिर्भर भारत हा कार्यक्रम जिल्हा स्तरावर घेणे, त्यानंतर ओकल फॉर लोकल प्रचार प्रसार स्थानिक मेळाव्यांचे आयोजन म.न.पा. तसेच पं.स. यांच्या माध्यमातून घेणे, २७ ते २८ सप्टेंबर जिल्हा स्तरावर मॅरेथोन स्पर्धा, २ ऑक्टोबर महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पांजली व खादी वस्तू खरेदी करणे, स्वदेशीचा नारा देणे, २९ ऑगस्ट ते २५ डिसेंबर या वेळेत महानगर स्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. इत्यादी कार्यक्रम घेऊन हा सेवा पंधरवडा कार्यकर्त्यांनी यशस्वी करावा, असे त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. यावेळी सोपान पेंढारकर, संध्याताई देठे, सिद्धिविनायक मुळे, महावीर ढक्का, बाबू मामा पवार, संदीप नाईकवाडे, रमेश गौरक्षक, ज्ञानेश्वर ढोबळे, शशिकांत घुगे, बाबुराव भवर, महेंद्र अकोले इत्यादींसह जालना महानगर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आजी-माजी न.प. जि.प. प.स.सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जालना महानगरात विक्रमी रक्त बॅग संकलित करणार - माजी आ.कैलास गोरंट्याल

यावेळी बोलताना माजी आ.कैलास गोरंट्याल यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी जालना महानगर मध्ये रक्तदान शिबिर घेऊन विक्रमी रक्त बॅग संकलित करण्यात येणार आहे. जालना महानगरात भाजपा नेते रावसाहेब पाटील दानवे, मा.आ.बबनराव लोणीकर, मा.आ.नारायण कुचे, यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा पंधरवाडा आपण सर्वांनी यशस्वी करून दाखवावा असे आवाहन गोरंट्याल यांनी कार्यकर्त्यांना केले.

# कुंटणखाना चालणाऱ्या राजमाता लॉजवर छापा

## महिलेला सोडलं, पुरुषांना पकडलं; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

जालना बस स्थानक परिसरातील राजमाता लॉजमध्ये एक इसम कुंटणखाना चालवित असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने पोलिसांनी छापा टाकला.

यावेळी कृष्णा हरदेकर, वय-३८ वर्ष, हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लॉजमधील रुम मध्ये बाहेरुन स्त्रीयाना आणून वेश्या व्यवसाय करून घेत होता. याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा टाकून त्याठिकाणी कुंटणखाना चालविणारा लॉज चालक कृष्णा हरदेकर, लॉजमध्ये आढळून आलेले पुरुष रवि जाधव, गजानन जाधव, दिपक जोशी मिळून आले. याठिकाणी रु.२२८०/रोख मिळून आले आहे. सदर कारवाइमध्ये चार महिलांची सुटका करण्यात आली. वरील आरोपींविरुध्द सरकारतर्फे फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षकआयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, देविदास भोजने, आक्रूर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, गणपत पवार, कविता काकस, सत्यभामा उबाळे यांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी हाऊसिंगकडून रक्तदान शिबिर संपन्न



अंबड । प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी हाऊसिंग सोसायटी मित्रमंडळ अंबड व श्री छत्रपती गणेश मंडळाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यासाठी जालना येथील जनकल्याण रक्तपिढीची टीम शिबिर घेण्यासाठी आली होती

या शिबिरात २६ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. हे गणेश मंडळं मागील ५ वर्षापासून गणपती उत्सव मध्ये रक्तदान शिबिर घेतात. या मंडळाचे अध्यक्ष राम पटवारी, उपाध्यक्ष राहुल टाक, सचिव आकाश सुभाष भादले, सहसचिव सुरेश वाघमारे, कोषाध्यक्ष रविंद्र कोकणे, प्रेम रूपवते, वैभव जैवळ, संतोष जोशी, अविनाश राठोड, इरफान पठाण, गौरव गाडेकर, त्र्यंबक गाडेकर, निखिल पाटील, अविनाश राठोड, अमोल गुप्ता, संभाजी जाधव, जयवंत गव्हाणे, देवेंद्र मुळे, विशाल मुळे, सचिन हांडे, बाळू पवार, सुभाष राठोड, वैभव लाड, सतिश सालेपवन, काळे, राम राठोड, राहुल गुप्ता, दत्ता जाधव, सुमित येडे, पवन तळतकर, नकिम शेख, सागर औरंगे, अभिषेक नाटकर, आदित्य बामणे पाटील,इरफान पठाण, अभिषेक वाघमारे या रक्तदान करून परिश्रम केले.

# वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी आ. खोतकर यांची आज मंत्रालयात बैठक

जालना । प्रतिनिधी

वानर या प्राण्यांकडून शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी अत्यंत त्रस्त झाले आहेत. वानरांचा कायदेशीर बंदोबस्त करण्याची मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केल्यामुळे वनमंत्री गणेशराव नाईक यांनी आज शुक्रवार दि.१२ सप्टेंबर रोजी मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे.



वानरना पकडून त्यांना अधिवासात (जंगल) नेऊन सोडण्याचा निर्णय यापूर्वी वन्यजीव संरक्षक कायदे अंतर्गत तरतुदीनुसार घेण्यात आला होता. सदरील उपद्रवी प्राण्यांना पकडण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षकांना प्रदान करण्यात आले होते. तसेच प्राणी पकडण्यासाठी लागणारा निधीही शासकीय योजनेतून दिला जात होता. परंतु तो निर्णय रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे उपद्रवी प्राण्यांचा त्रास खूप वाढला आहे. शेतकरी वर्गातून या प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे करण्यात आली होती. शेतमालाचे प्रचंड नुकसान होत असून वानरांचा खूप त्रास वाढला असून या प्राण्यांकडून मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे आमदार खोतकर यांनी वनमंत्री गणेशराव नाईक यांची भेट घेऊन निवेदन दिले. याबाबत वनमंत्री नाईक यांनी तात्काळ दखल घेत १२ सप्टेंबर, शुक्रवार रोजी मंत्रालयात महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस वनमंत्री गणेशराव नाईक, आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यासह अप्पर मुख्य वनसंरक्षक, वनबल प्रमुख मुंबई, प्रधान संरक्षण वन्यजीव नागपूर, समाधान गिरी सिल्लोड आदी उपस्थित राहणार आहेत. या माकडाचा / वानरांचा बंदोबस्त करण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षकांना देण्यात यावे तसेच त्यासाठी लागणारा निधीही तातडीने देण्यात यावा आणि उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा, यावर या बैठकीत महत्त्वाचा निर्णय होणार आहे.

# पंचायतराज अभियान अंतर्गत आज कार्यशाळा

अंबड। प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आज दि. १२ शुक्रवार रोजी आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमाता वाढविण्याकरीता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थीक वर्षांपासुन तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य अशा स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरीता मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या अभियानाचा कालावधी हा दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा आहे. त्या अनुषंगाने अंबड पंचायत समितीच्या वतीने दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी१२ वाजता मत्स्योदरी देवी सभागृह येथे कार्यशाळा ठेवण्यात आली आहे, अशी माहिती अंबड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांनी दिली. या शासन निर्णयामध्ये मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत एकूण ०७ मुख्य घटक आहेत. सुशासन युक्त पंचायत लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन तयार करणे. सक्षम पंचायत (स्वनिधी,व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थीक दृष्ट्या सक्षम करणे), जलसमृध्द स्वच्छ व हरीत गाव निर्माण करणे. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे, गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे, उपजिविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदानातून लोकचळवळ निर्माण करणे हे याचे उद्दिष्ट आहे. मत्सोदरी देवी संस्थान सभागृह अंबड येथे तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्योती कवडदेवी यांनी दिली आहे.

# २०९ अल्पवयीन वाहन चालकांवर कारवाई ;सहा लाखाचा दंड वसूल

जालना । प्रतिनिधी

अल्पवयीन वाहन चालकाच्या विरोधात पोलिसांनी विशेष मोहिम राबवली यावेळी एकूण २०९ अल्पवयीन वाहन चालक मिळून आले. यावेळी ६,३८,१००/- रुपये दंड आकारण्यात आला शिवाय पालकांना समज देण्यात आली.

जिल्हामध्ये अल्पवयीन वाहन चालकांकडून अपघात होणे, अल्पवयीन चालक स्वतः जखमी होणे व इतरांना जखमी करणे, अशा प्रकारची माहिती व तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यत आल्या होत्या. त्यानुसार जिल्हा पोलीस अधिक्षक मा. श्री अजयकुमार बन्सल अप्पर पोलीस अधिक्षक मा. आयुष नोपाणी यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली दि.१० सप्टेंबर रोजी जालना शहर व जिल्ह्यामध्ये अल्पवयीन वाहन चालकाच्या विरोधात कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. सदर मोहिमेसाठी समन्वयक म्हणून पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे शहर वाहतूक शाखा यांना नेमले होते. जिल्हातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व प्रभारी



ठाणेदार, सर्व कर्मचारी यांनी सहभागी होवून सकाळपासुनच शाळा, कॉलेज, शिकवणी वर्ग व महत्वाचे चौक या ठिकाणी कर्मचारी नेमून अल्पवयीन चालकांचा शोध घेतला. यावेळी जिल्ह्यामध्ये एकूण २०९ अल्पवयीन चालक वाहने चालवितांना मिळून आले. सदरची वाहने व अल्पवयीन मुले यांना पोलीस स्टेशन व शाखा कार्यालय या ठिकाणी आणुन त्यांच्या पालकांना बोलावण्यात आले. नमुद अल्पवयीन वाहन चालक यांना मोटार वाहन कायद्याबाबत मार्गदर्शन करुन परत अल्पवयीन असतांना वाहन न चालवण्याबाबत समज देण्यात आली. तसेच त्यांचया पालकांना सुध्दा योग्य ती समज देण्यात आली आहे. सदर कारवाई मध्ये एकुण ६,३८,१००/रुपयेचा दंड वसूल करण्यात आला, अशी माहिती पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. यापुढे कोणताही अल्पवयीन वाहन चालविताना मिळुन आल्यास त्याच्या पालकाविरुध्द दखलपात्र गुन्हाची नोंद संबंधीत पोलीस स्टेशनला करण्यात येईल व दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात येईल याची पालकांनी नोंद घ्यावी, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**ॲड. ओ.एच. देशमुख**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २५७/२०२५**

**भगवान वि. निल**

अर्जदार : १. भगवान पि. देवराव बनगर वय-७६ वर्षे, धंदा-शेती, रा. शिंगारवाडी, पो. तिंतरवाणी, ता. शिरूर कासार, जि. बीड

२. संगिता भ्र.दिलीप व्हरकटे वय-४९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मांगेवाडी, पो. लोणी, ता. शिरूर कासार, जि. बीड

अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत..

ज्यापोक्षा मयत नामदेव पि. भाउराव बनगर यांचा मृत्यू दि. २८.०३.२०२५ रोजी मौजे सरकारी हॉस्पीटल, बीड, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३१.१०.२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**क. लि**

स्वाक्षरित
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर. शिरूर का.

# प्रत्येक फाईलचा निपटारा तात्काळ करा; सेवा पंधरवडा उत्साहाने व जबाबदारीने पार पाडा -आ. लोणीकर

जालना

देशासह राज्यात देशासह राज्यात अत्यंत गतिमान आणि पारदर्शी सरकार आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी काम करत असताना सर्व लोकप्रतिनिधी सर्व पक्षाचे पदाधिकारी अधिकारी कर्मचारी या सर्वांनी देखील सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी अधिकाधिक काम करण्याची गरज असून पारदर्शी कारभार चालवण्याची आवश्यकता आहे त्याशिवाय गावाचा विकास होणार नाही. गावाचा विकास झाला तर राज्याचा पर्यायाने देशाचा विकास झपाट्याने होईल त्यासाठी कुठलाही कामचुकारपणा न करता प्रत्येकाने आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पडणे आवश्यक आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे केवळ एक उपक्रम नसून गावोगाव विकासाची नवी चळवळ आहे. गावपातळीवर सुशासन आणणे, ग्रामपंचायतींना आर्थिक स्थैर्य देणे, जलसंधारण आणि स्वच्छता



याकडे गांभीर्याने लक्ष गरजेचे आहे. पंचायत प्रतिनिधींनी निधी, स्वनिधी व लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य मिळवावे. महिलांचे बचतगट, युवक मंडळे आणि स्थानिक संस्था सक्षम केल्या तर ग्रामविकासाला गती मिळेल. जनतेचा विश्वास जपला तर ग्रामपंचायती ही लोकशाहीची खरी ताकद ठरतील. गाव मजबूत झाल्यास देश मजबूत होतो, ही भावना प्रत्येकाने मनाशी बाळगावी. या अभियानाच्या माध्यमातून गावोगाव विकासाची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाच्या विकाससाठी गावातील ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्यामध्ये समन्वय असणे देखील अत्यंत आवश्यक आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आपल्या भाषणात सामाजिक बांधिलकी बळकट करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायती आणि गावातील सर्व घटकांनी एकत्रितपणे बालविवाहासारख्या प्रथेला आळा घालणे,स्त्री भ्रूणहत्येसारख्या समाजघातक प्रवृत्ती थांबवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे ही जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे. गावातील महिला बचतगट, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणल्यास या मोहिमा यशस्वी होऊ शकतात. गाव विकास म्हणजे केवळ रस्ते आणि इमारती नव्हे, तर सामाजिक प्रगती, सुरक्षितता आणि समानतेच्या मूल्यांचा स्वीकार हा देखील त्यात अभिन्न भाग आहे. त्यामुळे या अभियानाच्या माध्यमातून गावोगाव बालविवाह रोखण्याची आणि भ्रूणहत्या थांबवण्याची मोठी चळवळ उभी करणे आवश्यक असल्याचे जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यावेळी म्हणाल्या. या कार्यशाळेला आ. नारायण कुचे, आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील. उपमुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे यांच्यासह सर्व शासकीय विभागांचे प्रमुख, वरिष्ठ अधिकारी, पंचायत समिती पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच तसेच ग्रामविकास क्षेत्राशी संबंधित मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात 'आविष्कार'चे उद्या उद्घाटन

## टीसी हरवला आहे

आकाश अशोक झगडे या नावाचा इयत्ता १२ वी. पास चा शाळेचा दाखला तसेच इयत्ता १० वी.चे मार्कशीट, इयत्ता १२ वी.चे मार्कशीट व शैक्षणिक कागदपत्रे आष्टी ते अहिल्यानगर प्रवासात हरवले आहेत.सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क**
**८८३०६५५५६४**

जालना । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय आविष्कार महोत्सव लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात येत्या शनिवारी (दि.१३) आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या संशोधन व जिज्ञासूवृत्तींना प्रोत्साहन देण्यासाठी राजभवनच्या वतीने राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. त्यापूर्वी ही विद्यापीठस्तरीय स्पर्धा होत आहे. आविष्कार स्पर्धांच्या तयारीसाठी मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत चारही जिल्ह्यातील महाविद्यालय निवडण्यात आली. तसेच १० ते २४ सप्टेंबर या दरम्यान जिल्हा स्तरीय आविष्कार स्पर्धांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानूसार लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर येथे उद्घाटनाचा कार्यक्रम दि.१३ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार आहे. या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांच्यासह आविष्कार समन्वयक डॉ.शैलेंद्र शेलार उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सहा शाखेतील विजेते स्पर्धक केंद्रीय आविष्कारमध्ये सहभागी होतील. तर प्रत्येक जिल्ह्यातून निवडण्यात आलेले टॉप थ्री संघ हे केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होतील. ३ व ४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजी नगर येथे ही स्पर्धा होणार आहे. जिल्हास्तरावर केवळ पदवीच्या विद्यार्थ्यांचा अविष्कार होईल. यामधील विजेते आणि पदव्युत्तर पदवी व पदवी तर पदव्युत्तरनंतरची पदवी या स्तरातील स्पर्धा थेट केंद्रीय स्तरावर होणार आहेत. ही स्पर्धा सहा गटात होईल. यामध्ये मानव्यविद्या, भाषा आणि ललित, कला, वाणिज्य, व्यवस्थापनशास्त्र आणि विधी, विज्ञान शाखा, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान औषधनिर्माण शास्त्र यांचा समावेश आहे.०००

**शनिवारी उद्घाटन :** 'आविषकार' नवोपक्रम व संशोधन स्पर्धेचे उद्घाटन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.महेंद्र शिरसाठ यांच्या हस्ते येत्या शनिवारी दि.१३ सकाळी १० वाजता महाविद्यालयांच्या प्रांगणात होईल. संस्थेचे सचिव कपिल आकात अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी उद्योजक संजय अग्रवाल, मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.संजय सांळुके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.भारत खंदारे, जिल्हा समन्वयक प्रा.संदीप पाटील, समन्वयक डॉ.शैलेंद्र शेलार यांनी केले आहे.

# उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केला पाच लाखाचा दंड वसूल

## पोलीस दलाने केली होती गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे चालकांवर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी तसेच सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद व राज्य शासनाचे आदेशानुसार निर्बंधांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी बीड पोलीस दलाकडून विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान शहरातील विविध ठिकाणी डीजे वाद्यांच्या माध्यमातून प्रचंड आवाजात ध्वनीप्रदूषण करून नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले.**

त्याअनुषंगाने बीड शहरातील पोलीस ठाणे पेठबीड, शिवाजीनगर, बीड शहर या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गणेश विसर्जनावेळी एकूण १५ वाहने जप्त करण्यात आली आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्या संबंधी अहवाल उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावरून उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून नमुद वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून त्यावरील एकूण दंडाची रक्कम ₹ ५,०४,०००/- इतकी आहे. ही कारवाई उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड तसेच पोलीस विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली असून पुढील काळातही अशा प्रकारे ध्वनीप्रदूषणाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी कायद्याचे पालन करून उत्सव आनंदात व शांततेत साजरे करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.



### कारवाई करण्यात आलेले वाहन

1. MH16Q1021 – 32,000/-,2. MH04BU4593 – ?30,000/-,3. MH12D8424 – 30,000/-,4. MH10Z437 – 32,000/-,5. MH20AT2394 – ?30,000/-,6. MH33-3076 – ?48,000/-,7. MH04DK1805 – ?35,000/-,8. MH50-2678 – ?39,000/-,9. MH23-5209 – ?52,000/-,10. MH23AS1650 – 44,000/-,11. MH23AS1605 – 36,000/- ,12. MH38B3496 – 25,000/-,13. MH25AD2183 – ?10,500/-,14. MH16CD8383 – 18,000/-,15. MH23AU6359 – 10,000/- अशा एकूण १५ डीजेच्या वाहनावर कारवाई करण्यात आली यांच्याकडून ५,०४,०००/- रुपये एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली.

# १७ सप्टेंबरला बीड-नगर रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार

## जिल्हा प्रशासन व रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात बहुचर्चित असलेली रेल्वे प्रत्यक्षात १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी रोजी सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी ब्रिजेशकुमार सिंग, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व इतर अधिकारी यांनी आज बीड येथील रेल्वे स्टेशन परिसराची पाहणी केली. बीड-नगर रेल्वेला १७ सप्टेंबरला



हिरवी झेंडी दाखविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे येणार आहेत.

जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जनता या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी बैठक व्यवस्था कशी असायला पाहिजे, पार्किंग व्यवस्था कशी असावी, व्हीआयपी आणि इतर रस्ते याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन ◀◀ पान २ वर

# बीडचे जिल्हा प्रशासन फक्त एकाच जातीसाठी आहे का?-ॲड. राऊत

## मराठवाडा मुक्तीदिनी एकाच जातीच्या प्रमाणपत्र वितरणाचा अट्टाहास कशासाठी?

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तिदिनाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यात कुणबी मराठा जातीच्या प्रमाणपत्रांचे वितरण मुख्यममंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याचे प्रशासकीय पातळीवर ठरत आहे. मराठवाडा हा सर्वांचा आहे, मराठवाडा मुक्तीदिनी प्रशासनाने केवळ एकाच जातीसाठी प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम ठेवणे म्हणजे सारे प्रशासन केवळ एका जातीसाठी काम करीत आहे का? असा सवाल समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केला आहे. प्रशासनाची ही भूमिका सामाजिक न्यायाची नसून याविरोधात आंदोलन करण्याचा इशारा देखील ॲड. सुभाष राऊत यांनी दिला आहे.



राज्य शासनाच्या नवीन शासन निर्णयानुसार निर्गमित केली जाणारी कुणबी मराठा प्रमाणपत्रे मराठवाडा मुक्ती दिनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत देण्याच्या हालचाली प्रशासनाने सुरु केल्या आहेत. यावर समता परिषदेचे ॲड.सुभाष राऊत यांनी आक्षेप घेतला आहे. मुळात शासन निर्णय निघाल्यानंतर इतक्या घाईत प्रशासनाने नोंदी कोठे शोधल्या?, गाव पातळीवरच्या समित्यांनी कधी चौकशी केली? आणि प्रमाणपत्रे कशी तयार झाली? हे सारे प्रश्न आहेतच. दुसरे म्हणजे आजही ओबीसींमधील अनेक जाती, भटके विमुक्त, अनुसूचित जमाती या प्रवर्गांना जात प्रमाणपत्रे मिळण्यात अनेक अडचणी आहेत, त्यांच्यासाठी प्रशासन काही करीत नाही, मात्र केवळ एका जातीसाठी असा विशेष कार्यक्रम राबविणे याचा अर्थ प्रशासन केवळ एका जातीसाठी काम करीत आहे असाच निघतो. ही भूमिका सामाजिक विषमता निर्माण करणारी आणि प्रशासकीय पातळीवर भेदभावाची आहे. त्यामुळे प्रशासनाच्या या निर्णयाविरुद्ध आंदोलन केले जाईल असे ॲड. सुभाष राऊत यांनी म्हटले आहे.

# काठोडा प्रकरणातील मुख्य आरोपी किरकटचा जामीन अर्ज फेटाळला

**तलवाडा । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील काठोडा गावातील एका शुल्लक कारणावरून ब्रम्हनाथ कोकरे यांच्या वर तीन जणांनी हल्ला केला होता या हल्ल्यात कोकरे यांचा हात फ्रॅक्चर झाला होता.**

तसेच स्कारपीओ गाडीने धडक देऊन हल्ला करून मारहाण केली व जीवें मारण्याची धमकी दिली होती त्या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन येथे दिं.३/६/ २०२५ रोजी आरोपी मुख्य आरोपी जयदत्त किरकट,व लहूराव किरकट, व तुकाराम किरकट,यांच्या विरोधात बी एन एस एस कलम २८१, ११८(१), ११८(२), ११५, ३५१(२), ३५२ नुसार विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी तीन महिन्यापासून फरार मुख्य आरोपी जयदत्त किरकट, यांनी अटकपूर्व जामीन मांडली होती यांचा जामीन बीड जिल्हा सत्र न्यायालयाने त्याची जामीन दिं.४/९/२५ रोजी फेटाळली आहेत

# पाटोदा व नायगावसाठी उच्च श्रेणी विश्रामगृह मिळणार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहर व तालुक्यातील नायगाव मयूर येथे असलेले शासकीय विश्रामगृहाचे उच्च श्रेणी विश्रामगृह रूपांतर होणार असून आमदार सुरेश यांनी छत्रपती संभाजीनगर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञ प्रारूप आराखडा अंदाजपत्रक करण्यासाठी सादर केले आहे पाटोदा शहराचा वाढता विस्तार आणि नायगाव पर्यटन स्थळाची वाढती लोकप्रियता विचारात घेता उच्च श्रेणी विश्रामगृह हे पाटोदा तालुक्याच्या पर्यटन प्रशासन विकासाला चालना देणारे होणार आहे आमदार सुरेश यांनी त्यांच्या मतदारसंघातील तिघे तालुक्याच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष दिले आहे शिक्षण आरोग्य पाणी पाणीपुरवठा नागरी सुविधा मूलभूत प्रश्न सोडवण्याबरोबर मतदारसंघात पर्यटन उद्योग व्यापाराच्या दृष्टिकोनातून विकास कामे मंजूर करण्यात येत आहे त्यामुळे तिन्ही तालुक्यांमध्ये ◀◀ पान २ वर

# संपादक जितेंद्र सिरसाट यांना पितृशोक!

**बीड । प्रतिनिधी**

संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट यांचे बुधवार दिनांक १० रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८१ वर्ष होते.



बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील मूळ रहिवासी व सध्या संत नामदेव नगर भागात रहिवासी असलेले सायं. दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांना पिंपळनेर आणि बीड परिसरात दादा या नावाने ओळखले जात होते. ते महावितरण मध्ये सेवा करून सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्यावर फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. बुधवार दिनांक १० रोजी दररोजच्या प्रमाणे घरी आराम करत असताना अचानक रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली. निधनासमयी त्यांचे वय ८१ वर्ष होते. गुरुवार दिनांक ११ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशान भूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी सिरसट कुटुंबीयांचे नातेवाईक, ग्रामस्थ, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, तीन मुली, जावाई नातू पणतू असा मोठा परिवार आहे.सिरसाट परिवाराच्या दुःखात दै राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा

## झगडे, बागवान, पवार,मकराणी,कदम,बचुटे,राजहंस, रानभरे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप झगडे, जुनेद बागवान, सचिन पवार, कादर मकरानी, चंद्रकांत राजहंस,गौतम बचुटे, संजय रानभरे,अविनाश कदम यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप झगडे, जुनेद बागवान, कादर मकरानी, सचिन पवार ,अविनाश कदम, चंद्रकांत राजहंस, गौतम बचुटे, संजय रानभरे यांनी केले आहे.

# टालेवाडी येथील जि. प. प्रा.शाळा ठरली सर्वोत्कृष्ट

**माजलगाव । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद बीड अंतर्गत मिशन जरेवाडी या उपक्रमांतर्गत माजलगाव तालुक्यातुन टालेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सर्वोत्कृष्ट शाळा ठरली आहे.**

जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्ह्यातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी मिशन जरेवाडी हा उपक्रम राबविण्यात आला होता. त्या अंतर्गत माजलगाव तालुक्यातुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टालेवाडी ही सर्वोत्कृष्ट शाळा ठरली आहे त्यानिमित्ताने दिनांक ०९ सप्टेंबर मंगळवार रोजी जिल्हा



परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदरील मिशन प्रभावीपणे राबविण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सुंदर राठोड,श्रीमती मनीषा कोल्हे, विकास पंडित,सुधाकर जाधव,रूपाली पंडित,श्रीमती शीतल राठोड, श्रीमती रेणुका जाधव यांनी खूप मोठे परिश्रम घेतले. यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युवराज वानखेडे, उपाध्यक्ष भारतराव शिंदे,सदस्य, शिक्षणप्रेमी व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. सर्व स्तरावरून विद्यार्थी व सर्व शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या तज्ज्ञ अभ्यास समिती मंडळावर अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड झाली आहे. डॉ.इंगोले यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.



महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अर्थात महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही नोंदणीकृत डॉक्टरांसाठीची सरकार नियुक्त समिती आहे. या समितीद्वारे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टर्सला अधिकृत मान्यता देणे तसेच दवाखाने व वैद्यकीय आस्थापना यांना मान्यता देणे किंवा नाही देणे याविषयी ही समिती कार्य करते. महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स व वैद्यकीय आस्थापनांवर महाराष्ट्र शासन या समितीद्वारे नियंत्रण ठेवते. वैद्यकीय उपचार करताना डॉक्टर व रूग्णालयाद्वारे योग्य प्रकारचा उपचार झाला आहे किंवा नाही, यामध्ये कुठे निष्काळजीपणा झाला आहे का..? याच्या पडताळणी करिता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची राज्य सरकार द्वारा नियुक्त ही समिती असते. संपूर्ण महाराष्ट्रातून विविध डॉक्टर्स व रूग्णालयांद्वारे झालेल्या मेडिकल निगलिजन्स केसेस या समितीद्वारे योग्य आहेत किंवा नाहीत याविषयी निर्णय घेतला जातो. त्यानुसार शासन गुन्ह्याचे स्वरूप ठरवून त्यावर डॉक्टर्स किंवा रुग्णालय प्रशासनावर कार्यवाही करते. घटनात्मकरित्या ही समिती अत्यंत जबाबदारीची व महत्त्वाची आहे. अशा महत्त्वाच्या समितीवर अंबाजोगाईचे अष्टपैलू व्यक्तिमत्व तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची निवड ◀◀ पान २ वर

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी आढावा बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा जिल्ह्यात दौरा होणार असून या दौऱ्यात अनेक महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ, जिल्हा क्रीडा संकुल उभारणी कामाचे भूमिपूजन, तसेच जिल्हास्तरीय गुरु गौरव पुरस्कार वितरण समारंभ पार पडणार आहे.**

या सर्व कार्यक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, उपविभागीय



अधिकारी, संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापली जबाबदारी वेळेत व काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश दिले. यावेळी कार्यक्रमांचे वेळापत्रक, स्वागत समारंभाची आखणी, सुरक्षा व्यवस्था, निमंत्रितांचे नियोजन, अभ्यागंतासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी विशेष सूचना केल्या.

# वाहिरा रस्त्यावरील अडथळा दूर करण्यासाठी तहसीलदारांनी स्वत: येऊन आमच्या रस्त्याचा मार्ग काढावा,ग्रामस्थांची मागणी

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील वाहिरा गावातील मुख्य रस्ता शेतकऱ्यांच्या हद्दीच्या वादामुळे बंद पडल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणीत सामोरे जावे लागत आहे. हा रस्ता गावाला बाजारपेठ आणि तालुक्याशी जोडणारा एकमेव रस्ता असल्याने त्याची सुटका करणे गरजेचे ठरले आहे. यासाठी ग्रामस्थांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना स्वतः हजर राहून रस्ता मोकळा करण्यासाठी आदेश देण्याची मागणी केली आहे.

वाहिरा ते पिंपळगाव दाणी हा शासकीय पांदण रस्ता सर्वे नंबर ९६,



९७ आणि ९८ दरम्यान येतो. स्थानिक शेतकऱ्यांच्या हद्द निश्चितीच्या वादामुळे हा रस्ता गेल्या काही काळापासून बंद आहे. गावाकडून बाजारपेठेकडे जाण्यासाठी आणि शाळा, दवाखान्यासाठी येण्या-जाण्याचा हा एकमेव रस्ता असल्याने ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्येची सुटका करण्यासाठी वाहिरा ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी भूमी अभिलेख कार्यालय, आष्टी यांच्याकडे मागणी केल्यानंतर सर्वे नंबर ९७ आणि ९८ ची हद्द निश्चिती करण्यात आली. आता दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी भूमी अभिलेख कार्यालयाच्या अधिकाऱ्यांद्वारे रस्त्याची हद्द खुणा स्पष्ट करण्यात येणार आहे. अशा वेळी रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून ग्रामस्थांनी तहसीलदार कार्यालयाकडे मागणी केली आहे की, तहसीलदार महोदया यांनी स्वतः हजर राहून पोलीस आणि इतर यंत्रणांसह रस्ता ताब्यात घेण्याचे आदेश द्यावेत. या संदर्भात ग्रामस्थांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना एक निवेदन सादर करून आपण स्वतः दि १२ सप्टेंबर रोजी तालुक्यातील पोलीस प्रशासन आणि रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी लागणाऱ्या यंत्रणांसह हजर राहून रस्ता मोकळा करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अशी कार्यवाही झाल्यासच रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण होणार नाही आणि रस्त्याचे काम निर्वाध पार पडेल.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात नागरिकांचा प्रभाग रचनेवर संताप

**पुणे । प्रतिनिधी**

**माँ जिजाऊंचा कसबा कुठे गेला?, ठरावीक नेत्यांना खुला प्रभाग मिळावा यासाठी मुद्दाम अनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण उठेल अशी प्रभाग रचना केली आहे. चुकीच्या पद्धतीने प्रभाग करून भाजपने स्वत:चा फायदा करून घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन करा असे हरकती नोंदवत शिवाजी महाराज की जय... डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो अशा घोषणा देत शेकडो नागरिकांनी प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती नोंदविल्या. नागरिकांचा या प्रभाग रचनेवर रोष बघता बालगंधर्व रंगमंदिर परिसरात व सभागृहात सुरक्षा रक्षकांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.**




पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. त्यावर ५ हजार ९२२ हरकती व सूचना नोंदविण्यात आलेल्या आहेत. या हरकतींवर आज (ता. ११) आणि उद्या (ता. १२) सुनावणी होणार आहे. आज पहिल्या दिवशी प्रभाग क्रमांक १ ते २९ च्या रचनेवर नोंदविण्यात आलेल्या हरकतींची सुनावणी झाली. यावेळी प्राधिकृत अधिकारी म्हणून शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर सचिव व्ही. राधा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त प्रसाद काटकर आदी उपस्थित होते.

महापालिका प्रशासनाकडे प्रभाग क्रमांक ३ विमाननगर-लोहगावमधून ८१९, प्रभाग क्रमांक १५ मांजरी बुद्रूक-साडेसतरानळी येथून ५५८ हरकती सूचना नोंदविण्यात आल्या होत्या. या प्रभागातील भौगोलिक आणि नैसगिक सीमा रेषा चुकीच्या पद्धतीने निश्चित केल्या आहेत असा आक्षेप होता, पण आज हरकतींवर सुनावणी होत असताना या दोन्ही प्रभागातून अनुक्रमे ५१ आणि ३० नागरिकच सहभागी झाले होते. त्यांचे आक्षेप प्रशासनाने नोंदवून घेतले आहेत. या सुनावणीमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या प्रवर्गाचे आरक्षण बदलण्यात आले आहे.

चुकीच्या पद्धतीने प्रभाग तयार करून या प्रवर्गातील कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्यात आले असल्याचा आरोप अनेक नागरिकांनी केला. प्रभाग क्रमांक २४ कमला नेहरू रुग्णालय-रास्ता पेठ या प्रभागातील अनुसूचित जातीचे आरक्षण प्रभाग क्रमांक १३ पुणे स्टेशन जयजवान नगरमध्ये हलविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याविरोधात सर्वपक्षीय कार्यकर्ते आक्रमक होऊन त्यांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली.

तसेच या प्रभागातून ८५ नागरिक हरकत नोंदविण्यासाठी आले होते. प्राधिकृत अधिकारी व्ही. राधा यांनी या नागरिकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी व्यासपीठावर बोलविले होते. पण त्याच वेळी महापालिकेचे अधिकारी बाहेरून तेथे आले असता नागरिकांनी व्ही. राधा यांना घेराव घातल्याचा समज झाला. त्यावरून भर सुनावणीमध्ये गैरसमज निर्माण झाला. त्यामुळे हे नागरिक आणखी आक्रमक होऊन त्यांनी घोषणा देऊन सभागृह दणाणून सोडले होते. मात्र, गैरसमज दूर झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

आज एकूण २९ प्रभागांवरील सुनावणी पूर्ण झाली आहे. यामध्ये २ हजार ९२० हरकतदारांपैकी ५४० नागरिक सहभागी झाले आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे, असे महापालिका प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

# नात्याला काळिमा.! मुलगा सुख देण्यास अकार्यक्षम; सासऱ्यासह तिघांविरोधात सुनेची तक्रार

**पुणे । प्रतिनिधी**

**मी तुला शारीरिक सुख देण्यास सक्षम नाही. त्यामुळे तू माझ्या वडिलांसमवेत संबंध ठेवून मला मूल दे अशी मागणी मुलाने स्वत:च्या बायकोकडे केली. मुलाचे वडील निवृत्त पोलीस अधिकारी आहेत.**



हा सर्व प्रकार पुण्यातील सहकार नगर मधील एका उच्चभ्रू सोसायटीमध्ये घडला आहे. ह्या प्रकरणी निवृत्त पोलिस अधिकाऱ्याचा सुने सोबत संबध ठेवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सहकारनगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.प्रकरणातील आरोपी सासरे हे निवृत्त पोलिस अधिकारी आहे. तर या प्रकरणी ३० वर्षीय पीडित सुने ने सहकारनगर पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. तर या प्रकरणी आरोपी पती, आरोपी सासरे आणि आरोपी सासू विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक सुरेखा चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित सुन आणि आरोपी पती यांचा मे २०२५ मध्ये लग्न झाले. त्यानंतर दोघे जण बाहेर फिरण्यास गेले. मात्र पती तिच्या सोबत बोलत नव्हता, सतत फोनवर असायचा, त्यावरून दोघांमध्ये वाद झाला.त्यावेळी आरोपी म्हणाला, मी तुझ्यासोबत संबध ठेवण्यास अकार्यक्षम असून तू माझ्या वडीलांसोबत संबध ठेवून आम्हाला मुल दे, असे त्याने सांगितले. हे ऐकून पीडित सुनेला धक्का बसला. त्यानंतर ते बाहेर गावावरून पुण्यातील घरी आल्यावर पीडित सुन तिच्या बेडरूममध्ये बसली होती.त्यावेळी आरोपी सासरे हे तिच्या रुममध्ये घुसून संबध ठेवण्याचा प्रयत्न करू लागले. त्यावर पीडित सुने ने विरोध केला. याबाबत सासू ला सांगितल्यावर, सासू ने देखील पती आणि मुलाला साथ दिली. त्यामुळे सुन दुसर्या दिवशी तिच्या घरी निघून गेली.तिच्यासोबत घडलेल्या प्रकाराबाबत तिने तिच्या कुटुंबीयांना सांगितले. त्यानंतर आमच्याकडे तक्रार येताच या प्रकरणी पती, सासरे आणि सासू या तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# गरजवंतांचा लढा श्रीमंतांच्याच फायद्याचा; प्रदेश प्रवक्ते शशिकांत तरंगे

**इंदापूर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात आज आरक्षण हीच प्रगतीची मुख्य किल्ली बनली आहे. आपल्यासारख्या गरजवंतांची प्रगती फक्त आरक्षणावरच अवलंबून आहे. असे का वाटायला लागले, हा खरोखरच गंभीर विचार करण्याचा विषय आहे. स्वातंत्र्यानंतर एवढा दीर्घ काळ गेला, पण राज्यकर्त्यांना आरक्षणाशिवाय प्रगतीचा दुसरा मार्ग निर्माण करता आला नाही, अशी चिंता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते शशिकांत तरंगे यांनी व्यक्त केली. ते इंदापूर येथे बोलत होते.**



तरंगे म्हणाले, आरक्षणाशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही, हा आत्मविश्वास जनतेमध्ये निर्माण करण्याचे काम राज्यकर्त्यांनीच केले. आरक्षणाने प्रगती होणार असेल, तर ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे आरक्षण दिले, त्यांची प्रगती महाराष्ट्रात किती टक्क्यांनी झाली? आणि ज्यांची प्रगती झाली, त्यांपैकी किती जणांनी आपल्या जातीतीलच गरजूंना संधी मिळावी म्हणून, स्वखुशीने आरक्षणातून मुक्त होण्याची मागणी केली? उत्तर स्पष्ट आहे. अशी एकही उदाहरणे दिसून येत नाहीत.

प्रत्येकाला स्वतः बलवान व्हायचे आहे, मग तो कोणत्याही जातीतला, भावकीचा किंवा नात्यागोत्यातला असो. मीच वर चढलो पाहिजे हा भाव मनामनांत घर करून बसला आहे. म्हणूनच आरक्षणाचा खरा हेतू म्हणजे गरजवंतांचा उद्धार तो हरवत चालला आहे, आणि त्याचा लाभ श्रीमंतांना अधिकाधिक मिळत आहे. आता मागणारे आणि अडवणारे यांच्या संघर्षाला उधाण आले आहे, असं शशिकांत तरंगे यांनी सांगितले.राज्यांत पिढ्यानपिढ्या विधानसभेत, लोकसभेत, विधान परिषदेत, राज्यसभेत, साखर कारखानदारीत, सहकारी बँकांत, कृषी उत्पन्न बाजार समित्यांत आणि मोठ्या उद्योगधंद्यांत एकाच कुटुंबांचा मक्तेदारीने प्रभाव राहिला आहे. त्यांनी आपल्या घरातील जागा सोडून एखाद्या खऱ्या गरजवंताला संधी दिली का? याचा प्रामाणिक विचार गरजवंतांनी स्वत:ला विचारला पाहिजे, असे आवाहन तरंगे यांनी केले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'पोषण आहार सप्ताह'

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये 'पोषण आहार सप्ताह' उत्साहात राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये संतुलित व आरोग्यदायी आहाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाला पालक व शिक्षकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधून राबवण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचे आरोग्यच नव्हे तर त्यांच्या कुटुंबीयांमध्येही सकारात्मक संदेश पोहोचतो. संतुलित आहार व योग्य पोषण हीच मुलांच्या सर्वांगीण विकासाची खरी पायरी आहे.
– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

आरोग्यदायी आहार हीच मुलांच्या निरोगी भविष्याची गुरुकिल्ली आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना लहान वयात योग्य आहाराचे महत्त्व समजते आणि त्यांचा शारीरिक तसेच मानसिक विकास घडतो.
– किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून आरोग्य आणि पोषणाचे धडे देण्याचा प्रयत्न या सप्ताहाच्या माध्यमातून करण्यात येतोय. खाद्यपदार्थांचे अंकुरित धान्य, आंबवलेले पदार्थ, पोषक पदार्थ, नाश्ता व उपवासाचे पदार्थ, ज्वारी-बाजरी व इतर धान्याचे पदार्थ, फळांचा दिवस असे गट करून त्यानुसार विद्यार्थ्यांचा प्रत्येक दिवसाचा आहार ठरविण्यात येतोय. तसेच विद्यार्थ्यांना प्रथिने, फायबर, खनिजयुक्त धान्यांचे महत्त्व व जीवनसत्त्वांचे महत्त्व सांगण्यात येत आहे. आंबवलेल्या पदार्थांमुळे पोषणमूल्य कसे वाढते? पचन कसे सुधारते? याबाबत माहिती दिली जातेय.

विद्यार्थ्यांना कार्बोहायड्रेट, प्रथिने, मेद, जीवनसत्त्वे व खनिजे या पाच प्रमुख अन्नघटकांबद्दल माहिती देण्यात येतेय. तसेच आरोग्यासाठी पाण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येत आहे. हा उपक्रम केवळ आहार सप्ताह न राहता विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळविणारा एक शैक्षणिक अनुभव ठरतोय.

आहाराचे वेळापत्रक

पहिला दिवस (अंकुरित धान्य) : मूग, मटकी, हरभरा यांचे पौष्टिक पदार्थ.

दुसरा दिवस (आंबवलेले पदार्थ) : इडली, सांबार, अप्पम यांसारखे पदार्थ.

तिसरा दिवस (पोषक पदार्थ) : पालक, मेथी यांचा समावेश असलेले पराठे, धिरडे, थालीपीठ.

चौथा दिवस (नाश्ता व उपवासाचे पदार्थ) : पोहे, उपमा, शिरा, साबुदाणा वडे/खिचडी.

पाचवा दिवस (ज्वारी-बाजरी व इतर धान्ये) : भाकरी, नाचणी व तांदळाचे पदार्थ.

सहावा दिवस (फळांचा दिवस) : सफरचंद, द्राक्षे, चिकू, संत्री यांसारखी हंगामी फळे.

# शनिवार पेठेतील मुठेश्वर मंडळावर गुन्हा दाखल; विसर्जन मिरवणूकीत आणला होता अडथळा



पुणे । प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन करून मिरवणुकीत अडथळा निर्माण केल्याप्रकरणी शनिवर पेठेतील मुठेश्वर मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलीस हवालदार समिर पवार (३८) यांनी दिलेल्या तक्रारीनूसार दिनांक ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास बेलबाग चौकाजवळ विसर्जन मिरवणूक सुरु होती. तेव्हा मुठेश्वर मंडळाची साऊंड सिस्टिम व देखावा ट्रॉली मिरवणुकीत अडथळा निर्माण करून थांबवण्यात आली.या वेळी बंदोबस्तावर असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत भस्मे व इतर पोलीस अंमलदारांनी मंडळाचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांना समजावून सांगितले. मात्र त्यांनी पोलीसांच्या सुचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून मिरवणुकीत अडथळा निर्माण केला. यानंतर मंडळाच्या अध्यक्षला नोटीस बजावण्यात आली. ती मंडळाचे पदाधिकारी सुमित कडेकर यांनी स्विकारली असून मंडळाने पोलिसांना दिलेल्या हमीपत्रातील सुचनांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले.या प्रकारात मुठेश्वर मंडळाच्या अध्यक्ष व कार्यकर्त्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ व १२६(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास पोलीस हवालदार गोंजारी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# भूमिअभिलेख'मध्ये होणार ९०५ भूकरमापकांची भरती

पुणे : राज्याच्या भूमिअभिलेख विभागात लघुलेखक, भूकरमापक (सर्वेअर) यासह वेगवेगळ्या अशा एकूण ९०५ पदांसाठी भरती होणार आहे. ही पद भरती करण्यासाठी राज्य शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. राज्यातील पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या महसूली विभागात रिक्त असलेल्या पदानुसार ही संख्या वाढविण्यात येणार आहे.

राज्य शासनाचा भूमिअभिलेख विभाग महसूल विभागात अत्यंत महत्त्वाचा आहे. या विभागाच्या माध्यमातून जमीन मोजणीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यात येतो. त्यासाठी मागील दोन वर्षांपूर्वी राज्यात १२०० भूकरमापकांची पदभरती करण्यात आली होती. मात्र, विविध कारणांमुळे सुमारे ७०० जणांनी नोकरीचा राजीनामा दिला.

त्यामुळे विविध महसूल विभागात कार्यरत असलेली भूकरमापकांची पदे रिक्त झाली. त्याचा परिणाम मोजण्यावर होऊ लागला. अनेक मोजण्या प्रलंबित राहू लागल्या.

ही बाब लक्षात घेऊन पुन्हा भूकरमापकांच्या भरतीसाठी भूमिअभिलेख विभागाच्या वतीने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. हा प्रस्ताव तत्वत: मान्य केला आहे. दरम्यान, या पदांबरोबरच लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदांसाठीदेखील भरती करण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे.

# पेट्रोल पंपांवरील स्वच्छतागृहे महिलांसाठी खुली करण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**शहरात महिलांच्या स्वच्छतागृहांची संख्या कमी आहे, नव्याने स्वच्छतागृह बांधण्यासाठी जागा मिळत नाही. त्यामुळे शहरातील सुमारे २५० पेट्रोल पंपांवरील स्वच्छतागृह महिलांना वापरता आले पाहिजेत यासाठी राज्य सरकारने निर्णय घ्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तुषार दामगुडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**

कामानिमित्त किंवा शिक्षण, खरेदी, प्रवास या निमित्ताने महिला घरातून बाहेर पडतात. पण सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असल्याने व अस्वच्छ असल्याने त्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. स्वच्छ व चांगले स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने त्यांची कुचंबणा होते. या समस्येवर उपाय म्हणून पेट्रोल पंपांवरील स्वच्छतागृहांचा वापर महिलांना करता आला पाहिजे. स्वच्छ पाणी, नियमित स्वच्छता, सुरक्षित प्रकाशव्यवस्था या सुविधांसह स्त्री सेविकेची नेमणूक झाली पाहिजे.

तुषार दामगुडे म्हणाले, महिलांसाठी पुरेशा स्वच्छतागृहांची संख्या नसल्याने त्यांची कुचंबणा होते. पुणे शहरात सुमारे २५० पेट्रोल पंप आहेत. ती जनतेसाठी खुली केल्यास फायदा होईल.



पेट्रोल पंपांना परवानगी देताना स्वच्छतागृहाची अट घालण्यात आलेली आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पेट्रोल पंप चालकांनी महिलांना स्वच्छता गृह वापरण्याची परवानगी द्यावी अशी मागणी केली आहे.

# वडगाव मावळ न्यायालयासाठी १०९ कोटींची नवीन भव्य इमारत; आमदार सुनील शेळके यांचा निर्णय

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

**मावळ तालुक्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात सुवर्णपान कोरणारा महत्वाचा टप्पा वडगाव मावळ येथे नोंदवला गेला. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, वडगाव मावळ येथे न्यायमूर्ती, वरिष्ठ वकील व बार असोसिएशन यांची संयुक्त बैठक आमदार सुनील शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत नागरिकांच्या न्यायप्रवेशासाठी दीर्घकाळापासूनची उणीव भासत असलेल्या भव्य न्यायालयीन वास्तू उभारणीचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. कृषी विभागाच्या जागेवर उभारण्यात येणारी ही इमारत पुढील ५० वर्षांचा विचार करून आधुनिक व अत्याधुनिक सुविधांसह बांधली जाणार आहे.**

या भव्य इमारतीमुळे वडगाव मावळ व परिसरातील नागरिकांना त्वरित, सुलभ व पारदर्शक न्याय मिळविण्याचा मार्ग सुकर होणार आहे. विशेषत: ग्रामीण व दुर्बल घटकांनाही न्याय मिळविण्यात आत्मविश्वास निर्माण होईल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

न्यायालयीन कामकाजात कार्यक्षमता वाढविणे, वकिलांना योग्य सुविधा उपलब्ध करणे आणि सर्वसामान्यांना न्यायालयीन वातावरणात सहज प्रवेश मिळावा हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस न्यायमूर्ती डी. के. अनभुले यांच्यासह अनेक ज्येष्ठ वकील व वडगाव मावळ बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रताप शेलार, लीगल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. रंजना भोसले यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.मावळ तालुक्याच्या सर्वांगीण विकासासोबतच सामाजिक न्यायप्रणाली सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. न्यायालयीन इमारतीच्या उभारणीचा निर्णय हा आमदारांच्या दूरदृष्टीचा व समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा पुरावा आहे. त्यांच्या पुढाकारामुळे न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक निधी, सुविधा व नियोजन योग्य पद्धतीने पार पडेल, अशी खात्री यावेळी व्यक्त करण्यात आली. या निमित्ताने वडगाव मावळ न्यायालयाला भविष्यातील न्यायनगरी बनविण्याचा मार्ग खुला झाला आहे.या बैठकीत घेतलेला निर्णय मावळ तालुक्याच्या न्यायनगरीसाठीच नव्हे, तर संपूर्ण पुणे जिल्ह्यासाठी ऐतिहासिक व दूरगामी परिणाम घडवणारा ठरणार आहे. न्यायाच्या दारी प्रत्येक नागरिक सहज पोहोचेल, अशी नवी दृष्टी या उपक्रमातून साकार होणार आहे.

# विजय शिवतारे यांच्या उपस्थितीत सिंचन भवन येथे बेठक संपन्न; अधिकाऱ्यांना दिल्या महत्वाच्या सूचना

सासवड : पुरंदर उपसा सिंचन योजनेला ४ टीएमसी पाणी सिंचनासाठी उचलण्यास परवानगी आहे. परंतु जलसंपदा विभाग योजना कार्यान्वित झाल्यापासून २ टीएमसी पेक्षा अधिक पाणी उचलू शकेलला नाही, ही बाब लक्षात घेऊन तांत्रिक दोष आणि जास्तीत जास्त जलवाहिन्याचे जाळे निर्माण करून पूर्ण क्षमतेने उपसा सिंचन योजना चालवावी. त्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून आणू, असे प्रतिपादन आमदार विजय शिवतारे यांनी केले आहे. सिंचन भवन येथे आमदार शिवतारे यांच्या उपस्थितीत पुरंदर उपसा योजना, कऱ्हा नीरा नदीजोड प्रकल्प व अन्य विषयांवर बैठक पार पडली. यावेळी त्यांनी उपसा योजनेच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

या बैठकीला शिवतारे यांच्यासह मुख्य अभियंता हेमंत धुमाळ, अधिक्षक अभियंता जैस्वाल, कार्यकारी अभियंता अशोक शेटे, राजेंद्र दुबल यांच्यासह शिवसेनेचे पुरंदर तालुकाप्रमुख हरीभाऊ लोळे, गणेशराव मुळीक, विक्रांत पवार, आड. नितीन कुंजीर, सामाजिक कार्यकर्ते तात्या मगर, अविनाश बडदे, विशाल लवांडे, दिपक काळे, उमेश काळे, सागर यादव यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार शिवतारे यांनी प्रस्तावित केलेल्या कऱ्हा नीरा नदीजोड प्रकल्पाच्या प्राथमिक आराखड्याचे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सादरीकरण केले. त्यात शिवतारे यांनी काही दुरुस्त्या प्रस्तावित केल्या. याशिवाय पुरंदर उपसा योजनेचे पंप कचरा, जलपर्णी व प्लास्टिक यामुळे मोठ्या प्रमाणात नादुरुस्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील मिठी नदीच्या स्वच्छतेसाठी वापरण्यात येत असलेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहून घ्यावे, अशा सूचना शिवतारे यांनी दिल्या आहेत. योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणारी यंत्रणा अत्यंत दर्जाहीन आणि संथ असल्याने त्यावर तातडीने कार्यवाही करावी, असेही शिवतारे यांनी यावेळी सांगितले.

**यंदा अतिरिक्त ३० कोटींचा निधी मिळणार**

दरम्यान गुंजवणी प्रकल्पाच्या सुधारित मान्यता प्रस्ताव आणि निधी उपलब्धतेबाबत तातडीने कार्यवाही करावी, असेही शिवतारे यांनी यावेळी सुचित केले. पुरंदर उपसा योजनेचे तलाव जोडण्यासाठी यंदा अतिरिक्त ३० कोटींचा निधी मिळणार असून पूर्व भागातील राजुरी, रिसे, पिसे, नायगाव आणि पांडेश्वर या गावांनाही पुरंदर उपसाचा नियमित लाभ मिळण्यासाठी ठोस कार्यवाही करावी, असे शिवतारे यांनी सांगितले.